2349

BVBK-0402381

वाचनालय प्रत

२३८१
१०।१।८०

म. ई. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २३८१ दिनांक ...........
विषय बालवा

म. ग्रं. सं. ठाणें, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र २३५७ दिनांक १०/७/९०
विषय बा.वा. क्र..........

# विज्ञानकथा

भाग ३ रा

अविनाश कोलारकर

हल्ली मुलांना
विज्ञानकथेचे वेड आहे
विज्ञान युगात
एकवीसाव्या शतकाकडे जाताना
अशा कथांची गरज आहे.
यातील अनेक कथांना बक्षिसेही मिळाली आहेत.
गाजलेल्या विज्ञानकथा

BVBK-0402381

प्रकाशक :
म. ना. जोशी
सन् पब्लिकेशन्स
३१७, नारायण पेठ,
दैनिक प्रभातसमोर,
पुणे - ३०.
फोन नं. ४४९५४१

सर्व हक्क सुरक्षित

लेखक - अविनाश कोलारकर

मुद्रक :
ना. गो. जोशी
अतुल एजन्सी
३१७, नारायण पेठ,
पुणे - ३०.

मुल्य १५ रु.

४ पुस्तकांचा संच मूल्य ६० रु.

**प्रकाशन – १५ ऑगस्ट ८९**

मागील भागावरून क्रमशः पुढे चालू.



# १२. लाल ढग

यान त्या ग्रहावर उतरले तेव्हा भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीर यांना आश्चर्याचा धक्काच बसला, कारण यानातून उतरून ते थोडे अंतर चालून जात नाहीत, तर कितीतरी माणसे त्यांच्याकडे धावत धावत येत आहेत, असे त्यांना दिसले.

'आपले स्वागत करण्यासाठीच बहुतेक ते येत असावेत.' शास्त्रज्ञ रवी म्हणाले.

'शक्य आहे.' शास्त्रज्ञ नवीन होकार दर्शवीत म्हणाले.

पण काय! त्यांचा अंदाज चुकला होता. त्या माणसांनी त्यांच्याकडे क्षणभर ढुंकूनही बघितले नाही. का कोण जाणे दहा-बारा फूट उंच असणारी गोरीपान माणसे आरडाओरडा करीत एकमेकांना हातवारे करून काहीतरी सांगत सैरावैरा पळून गेली. पळताना ती सारखी मागे वळून बघत होती. मधूनमधून आकाशाकडे बघत होती. जवळपासच्याच इमारतींमध्ये शिरत होती. लहान मुले, स्त्रिया, वृद्ध सारेच त्यात होते. थोड्या वेळापूर्वी वाहने, माणसे यांनी गजबजलेला रस्ता, काही क्षणातच सुनासुना झाला. दुकाने पटापट बंद होत होती. हॉटेल्स् बंद होत होती. आता रस्त्यांवर तर चिटपाखरू ही दिसत नव्हते. भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीर चालत चालत

मुख्य रस्त्यावर आले. तो रस्ता लांबच लांब गेलेला होता. त्याच्या दोन्ही बाजूला उंच उंच इमारती होत्या. ते सैरावैरा पळणारे लोक आकाशात, वारंवार बघतात तरी काय, हेच भारतीयांना कळत नव्हते. त्यांनी अगदी बारकाईने आकाशात काही दिसते का ते बघितले, पण तेथे काहीच नव्हते. आकाशाचा रंग किंचित् हिरवा होता नि तुरळक ढग तरंगत होते. पक्षी मात्र दिसत नव्हते. वातावरणात थोडा कोंदटपणा व दमटपणा जाणवत होता. सारखा घाम येत होता.

कपाळावरचा घाम पुसत शास्त्रज्ञ रवी आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले,

'हा प्रकार तरी काय आहे?'

'खरेच, काहीच उलगडा होत नाही.' शास्त्रज्ञ नवीन म्हणाले.

'आपल्याला बघून तर हे लोक घाबरले नसतील?'

'पण त्यांनी तर आपल्याकडे बघितले देखील नाही.'

'हो ना आणि पळताना सारखे आकाशाकडे काय बघत होते कोणास ठाऊक!'

'आकाशात तर काहीच दिसत नाही.'

'त्यांच्यापैकी एखाद्याला विचारले असते, पण सारेच दडून बसलेत.'

'चला, बघूया तरी कोणी भेटते का ते.'

त्या सामसूम रस्त्यावरून ते चालले होते. मात्र त्यांना कोणीच भेटत नव्हते. बराच वेळ ते तसेच चालत राहिले. आता त्यांना दूरवर असणारी एक उंच नि भव्य इमारत दिसत होती. इमारत शहरापासून तशी अलगच होती. आजूबाजूचा परिसर रम्य होता. त्या उंच इमारतीच्या प्रवेशद्वारावर एक उंच नि धिप्पाड माणूस उभा असलेला त्यांना दिसला. तो बहुतेक रखवालदार असावा. त्याच्या हातात रायफलसारखे शस्त्र होते.

'चला, त्याला विचारू. काही उलगडा तरी होईल.' शास्त्रज्ञ रवी.

'मला वाटते ही प्रयोगशाळाच असावी.' शास्त्रज्ञ नवीन.

'शक्य आहे.' एक अंतराळवीर म्हणाला.

मात्र त्यांना बघताच तो बारा फुटांचा उंच माणूस क्षणभर चकितच झाला. इतकी बुटकी माणसे त्याने बहुतेक पूर्वी बघितली नसावीत.

'आपण कोण? आपल्याला काय हवे आहे?' असे त्याने हातवारे करीतच विचारले. शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांनीही हातवारे करून संवाद साधला. थोडा वेळ जात नाही, तर त्याने आपल्या कोटाच्या खिशातून एक करड्या रंगाचे पंचकोनी यंत्र

काढले. ते ट्रान्सलेटर होते.

'ही इमारत कसली आहे?' शास्त्रज्ञ रवींनी त्याला विचारले.

'ही आमची राष्ट्रीय प्रयोगशाळा आहे.' त्याने सांगितले.

'आपण कोणत्या ग्रहावरून आलात?'

'पृथ्वीवरून.' नवीन.

'ही माणसे अशी सैरावैरा का पळताहेत?' शास्त्रज्ञ रवी यांनी त्याला विचारले.

'आमच्या ग्रहावर एक संकट आले आहे.'

'कसले?'

'ते आमचे शास्त्रज्ञ तुम्हाला सांगू शकतील.'

'आम्हाला त्यांना भेटायची इच्छा आहे.'

'मग चला ना.'

तो उंच माणूस लगेच त्यांना त्या भव्य दरवाज्यातून आत घेऊन गेला. प्रयोगशाळेच्या आवारात सर्वत्र रंगीबेरंगी फुले होती. एक मनमोहक सुगंध त्या वातावरणात दाटला होता. लिफ्टने ते पाचव्या मजल्यावर पोहचले. एका मोठ्या हॉलमध्ये त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ चर्चा करीत होते. त्या उंच माणसाने भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांची त्यांच्याशी ओळख करून दिली. त्यांचे शास्त्रज्ञ क्षणभर आश्चर्यचकित होऊन बघतच राहिले. त्यांचे चेहरे चिंताग्रस्त दिसत होते. बहुतेक तेथे महत्त्वाची मीटिंग चालू होती. काही शास्त्रज्ञ दुर्बिणीतून आकाशाचे निरीक्षण करीत होते.

'वेलकम्!' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांनी त्यांचे स्वागत केले.

'थँक्स्!' शास्त्रज्ञ रवी.

'बसा ना.' त्यांनी सांगितले.

'थोड्या वेळापूर्वीच आपल्या माणसाने सांगितले की, तुमच्या ग्रहावर एक संकट आले आहे.'

'खरे आहे.' त्यांचे शास्त्रज्ञ.

'पण कसले?' शास्त्रज्ञ नवीन.

'ती एक लांबलचक कहाणीच आहे.'

'म्हणजे ?'

'लाल ढग!'

'लाल ढग? हा काय प्रकार आहे?'

'सांगतो.'

'सांगा, जमले तर आम्ही काही मदत करू.'

आणि मग त्यांच्यापैकी पिंगट केसांचे, रुबाबदार पण वयस्कर असे एक शास्त्रज्ञ सांगू लागले, 'अगदी अलीकडील दोन महिन्यातील घटना आहे. आमच्या ग्रहावर एक विचित्र ढग आला आहे. लाल रंगाचा, पण हा ढग इतर ढगांसारखा नाही. तो क्षणात रंग बदलू शकतो नि इतर पांढऱ्या ढगात मिसळून जाऊ शकतो. हा ढग फार घातक आहे. माणसांचा छोटा समूह दिसला की, तो नकळत क्षणात अवतरतो आणि माणसांवर हल्ला करतो. त्याने हल्ला करताच माणसांवर विचित्र परिणाम होतात. गेल्या दोन महिन्यांपासून या लाल ढगाने आमच्या ग्रहावर नुसता गोंधळ उडवून दिला आहे. सर्वत्र घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. या ग्रहावरील जवळजवळ प्रत्येक शहरावर तो तरंगत असतो. आतापर्यंत कितीतरी लोक त्याच्या तावडीत सापडले आहेत. त्यांना दवाखान्यात भरती करून त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. मात्र त्यांच्यात काहीच सुधारणा घडून येत नाही. त्यांच्या शरीरांवर विचित्र परिणाम झाले आहेत. सध्या हा लाल ढग आमच्या शहरावरच तरंगत आहे. मात्र त्याला शोधून काढणे शक्य नाही, कारण तो इतर ढगात अगदी बेमालूमपणे मिसळून गेला आहे. तो अतिशय तेजस्वी आहे. त्याच्या भोवती चंदेरी वलये आहेत. तो जेव्हा हल्ला करतो, तेव्हा ती वलये अतिशय तेजस्वी बनतात- असे त्या लाल ढगाला ज्यांनी काळजीपूर्वक बघितले, ते सांगतात. त्याचा पाठलाग करणे शक्य होत नाही, कारण क्षणात तो दिसेनासा होतो. त्याला नष्ट कसे करता येईल, याचाच आमचे शास्त्रज्ञ विचार करीत आहेत. तसे काही प्रयत्न यापूर्वी आम्ही केले आहेत, पण त्यांना यश आले नाही. हा असा एकच लाल ढग आहे की, आणखी असे काही आहेत, याचाच उलगडा होत नाही. या संकटावर मात करण्याकरिता काही उपाय शोधून काढण्यासाठीच आज आम्ही ही मीटिंग घेतली. काल संध्याकाळीच काही माणसांवर त्याने हल्ला केला आणि या लाल ढगाबाबत सर्वात महत्त्वाची नि कोड्यात टाकणारी गोष्ट म्हणजे, तो एकट्या-दुकट्या माणसावर हल्ला न करता, समूहावरच हल्ला करतो.'

'यापूर्वी आपण काय काय प्रयत्न केले?' शास्त्रज्ञ रवी.

'एकदा तर उडत्या तबकडीतून आम्ही त्याचा पाठलाग केला; मात्र उपयोग

—हीच झाला नाही. टेकड्यांवरील पांढऱ्या ढगात तो बघता बघता दडून गेला.'

'लेसर किरणांचा मारा केला?' शास्त्रज्ञ नवीन.

'हो, तोही प्रयोग झाला. दिवसेंदिवस या ग्रहावरील वातावरण भीतीपूर्ण होत ालले आहे. लोक बाहेर पडायलाही घाबरतात. शक्य तितक्या लवकर या लाल गाला नष्ट करायला हवे.'

'ते खरेच आहे.' शास्त्रज्ञ रवी.

'मला वाटते, आम्ही आपल्याला या बाबतीत निश्चितच मदत करू शकू.' ास्त्रज्ञ नवीन.

'ती कशी काय?' त्यांचे शास्त्रज्ञ.

'पण त्यासाठी काही काळ लागेल.'

'चालेल, निदान या संकटातून कायमची सुटका तरी होईल.'

'आम्ही त्या दवाखान्यात असलेल्या माणसांना बघू शकतो ना?'

'निश्चितच'

'ज्यांनी त्या लाल ढगाला प्रत्यक्ष बघितले नि ज्या लोकांवर त्याने हल्ला केला, त्यांच्याकडून आपल्याला नक्कीच काही खात्रीलायक माहिती मिळू शकेल.' शास्त्रज्ञ रवी.

'असे करा, आपण थोडी विश्रांती घ्या. थोड्या वेळातच आम्ही ही मीटिंग आटोपतोय.'

'चालेल.'

भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांनी एका मोठ्या हॉलमध्ये थोडा वेळ आराम केला. थोड्याच वेळात मग त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ त्यांना दवाखान्यात घेऊन जायला आले. दुतर्फा उंच उंच इमारती असणाऱ्या, शुकशुकाट असणाऱ्या रस्त्यावरून त्यांची गाडी जात होती.

थोड्याच वेळात गाडी एका मोठ्या इमारतीसमोर थांबली.

'हाच तो दवाखाना.' ते म्हणाले आणि मग ते एका लांबलचक पोर्चमधून जाऊ लागले.

निरनिराळ्या औषधांचा वास सर्वत्र दाटला होता. डॉक्टरांची नुसती धावपळ चालू होती. बुटांचा, सँडल्सचा 'टक्ऽ टक्ऽ' असा आवाज घुमत होता. लाल ढगाने हल्ला केलेले लोक येतच होते. त्यांना ताबडतोब ॲडमिट् करून घेतले जात होते.

संध्याकाळ होऊन गेलेली होती. पोर्चमध्ये मंद प्रकाश होता. घड्याळ टिकटिकत होते. खोल्याखोल्यांमधून पेशंटस्‌च्या कण्हण्याचे आवाज येत होते. त्यांना अगदी असह्य वेदना होत होत्या. डॉक्टर्स इलाज करीतच होते; पण म्हणावा तसा फायदा पेशंटस्‌ना जाणवत नव्हता. आपल्याला निश्चितपणे काय होत आहे, हेच त्यांना सांगता येत नव्हते. त्यामुळे डॉक्टरांना उपाय करण्यात अनेक अडचणी येत होत्या. उपचारांना निश्चित अशी दिशा मिळत नव्हती, तरी ते त्यांच्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. माणसांचे ते होणारे हाल शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांना बघवत नव्हते. त्या लाल ढगाचा लवकरात लवकर बंदोबस्त न झाल्यास, ही समस्या गंभीर स्वरूप धारण करणार होती.

त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांनी भारतीय शास्त्रज्ञ व अंतराळवीरांची डॉक्टरांशी ओळख करून दिली.

'डॉक्टर, हे पृथ्वीवरून आले आहेत.'

'वेलकम्, वेलकम्!'

'थँक्स्, आम्हाला थोडे सहाय्य हवे आहे.' शास्त्रज्ञ रवी.

'कोणत्या बाबतीत?'

'या पेशंटस्‌ना आम्ही काही प्रश्न विचारू इच्छितो. आम्हाला असा विश्वास आहे की, त्यातून या लाल ढगाला नष्ट करण्याचा काही मार्ग निघू शकेल.'

'मग विचारा ना! त्यात विचारण्यासारखे काय आहे?'

'दॅटस् फाईन!' शास्त्रज्ञ नवीन.

'चला.'

लगेच डॉक्टर त्यांना एका मोठ्या हॉलमध्ये घेऊन गेले. लाल ढगाने हल्ला केलेले कितीतरी पेशंटस् तेथे होते. कोणाचे केस गळून पडले होते, तर कोणाच्या दृष्टीवर विपरीत परिणाम झाला होता. काहीजणांना हृदयविकाराचा झटका येऊन गेला होता. काहींचे केस पिकू लागले होते, तर काहींच्या मेंदूत भयंकर वेदना होत होत्या, पण आपल्याला निश्चितपणे काय होत आहे, हेच पेशंटस्‌ना कळत नव्हते. भारतीय शास्त्रज्ञ व अंतराळवीरांनी मग काहीजणांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

'लाल ढग आपण प्रत्यक्ष बघितला, तेव्हा तुम्हाला काय वाटले? नि त्याने हल्ला केल्यानंतर काय वाटले?' शास्त्रज्ञ रवींनी एका पेशंटला विचारले.

'मला लाल ढग दिसला तेव्हा त्याच्या भोवती तेजस्वी चंदेरी वलये होती. 'उँ ऽ उँ ऽ' असा आवाज करीत त्याने आमच्यावर हल्ला चढविला. क्षणभर डोळ्यांसमोर गर्द धुके पसल्यासारखे झाले. आपल्याला लाल मुंग्या चावत आहेत, असे वाटले, अंगाची आग होऊ लागली आणि नंतर काय झाले, हे कळलेच नाही.'

'ठीक आहे. बरं, तुमचा काय अनुभव आहे, त्या लाल ढगाबाबत?' शास्त्रज्ञ नवीन दुसऱ्या पेशंटकडे वळत म्हणाले.

'तो लाल ढग कोठून नि कसा आला, हेच आम्हाला कळले नाही. त्याच्या तडाख्यात सापडताच डोळ्यांत भयंकर असह्य वेदना झाल्या व डोळ्यांसमोर गडद काळा पडदाच कोणी धरला आहे, असे वाटले.'

भारतीय शास्त्रज्ञांनी अनेकजणांच्या मुलाखती घेतल्या. बाहेर अंधारून आलेले होते. त्या हॉलमध्ये ट्यूबचा पांढरा निळसर प्रकाश पसरला होता. पेशंटसूच्या चेहऱ्यांवरील ताण स्पष्ट जाणवत होता. डॉक्टरही ह्या विचित्र प्रकाराने बुचकळ्यात पडले होते. संपूर्ण दवाखान्यावर उदासपणाची एक छाया पसरली होती. हॉलच्या खिडक्यांमधून उंच उंच झाडांमागे थरथरणारी चंद्रकोर दिसत होती. फुलांचा सुगंध वाऱ्यात दाटू लागला होता. ते दवाखान्यातून बाहेर पडले आणि मग निळसर प्रकाशात चमकणाऱ्या शांत रस्त्यावरून त्यांची गाडी भरधाव वेगाने त्या ग्रहावरील एका शास्त्रज्ञांच्या घराकडे निघाली. भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीर यांना ते रात्रीच्या जेवणाकरिता स्वतःच्या घरी घेऊन चालले होते. आता रस्त्यावरची काही दुकाने अर्धवट उघडलेली दिसत होती. दुपारपासून इमारतींमध्ये दडून बसलेली माणसे हळूहळू, दबकत गॅलरीत येऊन उभी राहात होती.

'हे आलेच माझे घर!' गाडी थांबवीत त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ पॅट्रिक म्हणाले.

दारावरची बेल वाजताच दार उघडले गेले.

'बाबा आले!' म्हणत पॅट्रिक यांच्या मुलांनी त्यांच्या भोवती गोळा होऊन त्यांची चौकशी करण्यास सुरुवात केली.

'बाबा, आज आम्ही संपूर्ण दिवस घरातच खेळलो.' ती सांगत होती. लाल ढग त्या शहरावर तरंगत आहे, हे कळल्यापासून त्या ग्रहावरील काही शास्त्रज्ञांनी शाळा बंदच ठेवण्याबाबत सूचना दिली होती. मुलांना घरातच खेळावे लागायचे. बागेतही जात येत नव्हते, कारण तो लाल ढग केव्हा नि कोठून अवतरेल व हल्ला चढवेल, हे सांगता येत नव्हते. त्या ग्रहावरील थिएटर्स, सार्वजनिक उद्यानेही जवळजवळ

बंदच असल्यासारखीच होती.

'बाबा, तुम्ही पाहिला का हो तो लाल ढग?' मुलांनी त्यांना विचारले.

'हो तर, हे बघा माझ्यासोबत कोण आले आहे आपल्याकडे!'

'कोण?'

'हे पृथ्वीवरून आले आहेत, दुसऱ्या सूर्यमालेतील एका ग्रहावरून! आता त्या लाल ढगाला नष्ट करण्याच्या मोहिमेत हे आपल्याला मदत करणार आहेत.'

'खरेच!'

'हो. आता घाबरण्याचे काहीएक कारण नाही. लवकरात लवकर आम्ही त्या ढगाचा बंदोबस्त करू. मग नेहमीप्रमाणे शाळेत जायचे, बागेत खेळायचे...' भारतीय शास्त्रज्ञांनी त्या मुलांना सांगितले.

'एक महत्त्वाची सूचना' एका मोठ्या हॉलमध्ये ठेवलेल्या टी.व्ही. वर तेवढ्यात सांगण्यात आले - 'या ग्रहावर वावरत असणारा अतिशय घातक लाल ढग सध्या आपल्या शहरावर तरंगत आहे. आज दुपारीच त्याने काहीजणांवर हल्ला चढविला. तेव्हा शक्यतो घराबाहेर पडू नये. घराची दारे नि खिडक्या नीट लावून घ्याव्यात. हा लाल ढग कोणत्याही क्षणी हल्ला करू शकतो. तो जवळपास वावरत आहे, हे कसे ओळखाल? तुमच्या रेडिओत किंवा टी.व्ही. त अचानक खरखर होऊ लागल्यास सावध राहा. असे होत असल्यास तो ढग जवळपास वावरत आहे, हे समजावे. तेव्हा सावधगिरी म्हणून टी.व्ही. सतत चालू ठेवावा. मनोरंजनाचे कार्यक्रम दाखविले जातील. विशेषतः लहान मुलांना अजिबात घराबाहेर सोडू नये. सर्व शाळा बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आलेले आहेतच. महत्त्वाचे प्रकटन संपले.'

जेवण झाल्यानंतर भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीर एका बंदिस्त गाडीतून प्रयोगशाळेत पोहचले. रात्रीत त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांशी त्या लाल ढगाबाबत चर्चा करणार होते.

मध्यरात्र झालेली होती. निळसर-पांढऱ्या लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या झगमगाटात संपूर्ण शहर बुडून गेले होते. लाल ढगावर चर्चा चालूच होती.

'लाल ढगाविषयी काही माहिती मिळाली का? म्हणजे ट्रीटमेंटच्या बाबतीत काही मार्गदर्शन होऊ शकेल.' प्रयोगशाळेत डॉक्टरांचे दवाखान्यातून सारखे फोन येतच होते.

'सॉरी....' म्हणण्याखेरीज शास्त्रज्ञ काहीच करू शकत नव्हते.

'या भयंकर संकटातून आपण देशाला वाचवाल, अशी आशा आहे.' असा
ाध्यक्षांचा फोनही येऊन गेला होता.

'टण्ऽ टण्ऽ टण्ऽ' घड्याळ्यात पडलेले तीनचे टोले त्या शांत वातावरणात अगदी
ट घुमले. त्या चर्चेतून एका महत्त्वाच्या निष्कर्षाप्रत भारतीय शास्त्रज्ञ पोहचले
.

'मला वाटते, या ढगासारखेच आणखी काही ढग या ग्रहावर वावरत असावेत.'
त्रज्ञ रवी.

'शक्यता नाकारता येत नाही.'

'म्हणूनच आपल्याला त्या लाल ढगाला नष्ट करण्यापूर्वी त्यातील घटकांचा
्यास करणे आवश्यक आहे.'

'ते का?'

'त्यातील घटक कळले, तर आपण इतर लाल ढग आढळल्यास त्याला सहज
 करू शकू.'

'खरे आहे! पण...'

'पण काय?'

'त्यातील घटकांचा अभ्यास करणार कसा?'

'इटस् व्हेरी सिंपल!' शास्त्रज्ञ नवीन.

'म्हणजे?'

'अनेक कवचे असणाऱ्या एका मोठ्या पेटीत आपण त्या लाल ढगाला
डायचे.'

'पण ते कसे?'

'सांगतो, त्यासाठी आपल्याला रोबोंची म्हणजे यंत्रमानवाची एक सभा भरवावी
णार.'

'रोबोंची मीटिंग?'

'हो. कारण लाल ढगांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माणसांचा छोटा-
 समूह दिसताच, त्यावर तो हल्ला चढवितो.'

'राईट यू आर!'

'ह्या रोबोंच्या मीटिंगमध्ये एक रोबो भाषण देईल आणि इतर उभे राहतील.
 समूह दिसताच तो लाल ढग त्यावर हल्ला चढवेल.'

'हो, पण....'

'काय?'

'त्या लाल ढगातील घटकांचा अभ्यास कसा करायचा?'

'ते फारसे अवघड नाही. हे सारे रोबो कॉम्प्युटर्सद्वारे कार्यान्वित करण्यात येतील. प्रत्येक रोबोंत त्या ढगातील घटक, त्याचे तपमान, त्या घटकांचे प्रमाण आणि इतर अनेक गोष्टींचे मापन करणारे यंत्र असेल. ते यंत्र ती माहिती लगेच कॉम्प्युटर्सना पुरवेल.'

'ते खरे आहे, पण रोबोच निकामी झाल्यास?'

'काही निकामी होतील. मात्र त्याआधीच आपल्याला त्या लाल ढगातील घटकांची माहिती मिळेल.'

'मग केव्हा कार्यान्वित करायची ही मोहीम?'

'शक्यतितक्या लवकर, कारण तो लाल ढग सध्या याच शहरात वावरत असल्याने, त्याला पकडणे सोपे जाणार आहे.'

'उद्या रोबोंची मीटिंग अ‍ॅरेंज करावी का?'

'व्हाय नॉट? शुअर!'

'पण त्या पेटीत त्याला पकडायचे कसे?'

'प्रभावी गुरुत्वाकर्षण निर्माण करून. ती सभा चालू असताना तो त्या रोबोंवर हल्ला करण्याकरिता बराच खाली येईल, तेव्हा त्याला त्या पेटीत खेचून घ्यायचे. त्या लाल ढगातील घटकांचा अभ्यास केल्यानंतर, त्याला निष्प्रभ करणेही शक्य होऊ शकेल.'

'प्लॅन खरेच चांगला आहे.'

'बरं, मग उद्या दुपारीच रोबोंची सभा भरवू या.'

'चालेल! आता निवांत झोपा.' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ म्हणाले.

ते त्या हॉलमधून बाहेर पडले तेव्हा पहाटच झाली होती: गारठा जाणवत होता. आकाशात चांदण्या लुकलुकत होत्या. आजूबाजूच्या साऱ्या प्रदेशावर गर्द पांढुरके धुके पसरले होते. प्रयोगशाळेभोवतालची उंच उंच झाडेही त्या धुक्यात पार गुरफटून गेली होती.

'आम्हाला चहा मिळू शकेल का?' भारतीय शास्त्रज्ञांनी विचारले.

'का नाही? चहा तयारच आहे.'

चहा घेतल्यावर त्यांना जरा तरतरीत वाटले.

नंतर दुपारी सर्व शास्त्रज्ञ पुन्हा त्या मोठ्या हॉलमध्ये जमले. रोबोंची सभा शहरापासून अगदी दूर असणाऱ्या एका प्रयोगशाळेच्या मागच्या बाजूला असणाऱ्या एका ग्राउंडवर घेण्यात येणार होती. लगेच मग त्या ग्राउंडवर अनेक सुरक्षाकवचे असणारी एक भली मोठी पेटी ठेवण्यात आली. जवळजवळ दोनशे रोबो कार्यान्वित केले जाणार होते. रोबोला भाषण देण्यासाठी एक स्टेज उभारण्यात आले होते. काही रोबो बसून, तर काही उभे राहून भाषण ऐकणार होते. भाषण देणाऱ्या रोबोला कोट घालण्यात आला होता. त्याच्या हालचालीत माणसांच्या हालचालींसारखी सहजता आणण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात येणार होता आणि मग होता होता सारी तयारी पूर्ण झाली. त्या मीटिंगबाबत गुप्तता पाळण्यात येणार होती. त्यावेळी आसपास कोणासही फिरकू दिले जाणार नव्हते. प्रयोगशाळेकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांवर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आता प्रयोगशाळेच्या मागच्या ग्राउंडवर रोबो हिंडू-फिरू लागले होते. साधारणतः सभेच्या ठिकाणी असतो, तसा गडबड-गोंधळ मुद्दामच निर्माण करण्यात येत होता. विचित्र हातवारे करीत रोबो एकमेकांशी बोलत होते. कॉम्प्युटर्सद्वारे त्यांना वेळोवेळी निरनिराळ्या सूचना देण्यात येत होत्या. स्टेजजवळच प्रभावी गुरुत्वाकर्षण निर्माण केलेले होते. लाल ढग त्या मोठ्या पेटीपाशी येताच त्याला क्षणात आत खेचून घेतले जाणार होते.

'मला वाटते, रोबोंची सभा सुरू करायला हरकत नाही.' शास्त्रज्ञ रवी.

'ऑफकोर्स!'

आणि मग रोबोंची सभा सुरू झाली. प्रयोगशाळेतल्या दुर्बिणीद्वारे त्या लाल ढगाचा शोध घेणे चालूच होते. काही शास्त्रज्ञ गॅलरीत उभे राहून निरीक्षण करीत होते. मग सुटाबुटातला, कोट-टाय घातलेला एक उंच रोबो स्टेजवर आला. सर्व रोबोंनी टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले. त्याचे भाषण सुरू झाले. त्या ग्रहावरील माणसांच्या आवाजाशी खूप साम्य असणाऱ्या आवाजात रोबो हातवारे करीत, मान हलवीत माईकसमोर बोलत होता. ज्याला ह्या मीटिंगबाबत काहीच माहिती नाही, त्याला तर वाटले असते की, खरेच येथे कसलीतरी सभा चालू आहे. रोबोंच्या सर्व हालचाली प्रयोगशाळेतील टी.व्ही. वर अगदी स्पष्ट दिसत होत्या. थोड्या थोड्या वेळाने टाळ्यांचा कडकडाट केला जात होता. मात्र लाल ढग येण्याचे काहीच चिन्ह दिसत नव्हते. आकाशात फक्त पांढरे ढगच तरंगताना दिसत होते. आता तर दुपारही

टळून गेली होती. प्रयोगशाळेच्या चहुबाजूच्या आकाशाचे निरीक्षण चालूच होते, पण कोणासही तो दिसत नव्हता. त्या दिवशी सकाळपासूनच तो शहरात कोणालाच दिसला नव्हता. सर्व शास्त्रज्ञ आतुरतेने त्याचीच वाट बघत होते. मात्र त्यांची निराशाच होत होती. संध्याकाळ होऊ लागली होती. टेकडीवर सूर्य टेकलेला होता. आजूबाजूचे ढग रंगीत झाले होते.

'बहुतेक तो आता येणार नाही असे दिसते.' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ म्हणाले.

'असे निराश होऊन कसे चालेल? वाट बघू या.'

'या शहरातून तो गेला तर नसेल ना?'

'नाही, तशी बातमी तरी अजून मिळाली नाही. इतर शहरांत दिसल्याची नोंदही नाही.' शास्त्रज्ञ नवीन.

'तेही खरेच.'

'आमची तर खात्री आहे की, त्याला पकडण्यात आपण यशस्वी होऊ.'

'तसे झाले तर फारच उत्तम. या ग्रहावरचे भयंकर संकट टळेल. येथील जीवन तर पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.'

किंचित् अंधारू लागले होते. रोबोंची सभा चालूच होती. टी.व्ही. वरील सर्व हालचाली शास्त्रज्ञ अगदी बारकाईने बघत होते. सूर्यास्त झाला होता. लाल ढग येण्याचे काहीच चिन्ह दिसत नव्हते. तेवढ्यात अचानक टी. व्ही. च्या प्रक्षेपणात अडथळा आला नि 'खर्ऽखर्ऽ' असा आवाज येऊ लागला.

'लाल ढग येत आहे! सावध राहा!' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ सांगत होते.

'खात्रीने सांगता?' शास्त्रज्ञ रवी नि नवीन.

'अगदी खात्रीने. कारण मागच्या वेळी तो लोकांना दिसला, तेव्हा प्रक्षेपणात अडथळा येऊन अशीच खरखर झाली होती.'

'म्हणजे आपल्याला यश येणार म्हणायचे.'

'नक्कीच!'

संध्याकाळच्या त्या वातावरणात अचानक दमटपणा नि कोंदटपणा वाढू लागला. घरट्यांकडे परतलेले पक्षी किलबिलाट करीत उडून जाऊ लागले. झाडांची पाने एकदम मलूल झाल्यासारखी जाणवू लागली. मात्र दुर्बिणीतून काहीच दिसत नव्हते आणि तेवढ्यात फिकट निळसर टेकड्यांकडून प्रयोगशाळेच्या दिशेने एक मोठा. पांढरा ढग तरंगत येताना दिसला. मात्र तो ढग साधा नव्हता. अतिशय वेगाने तो

येत होता. थोड्याच वेळात तो ढग प्रयोगशाळेवर तरंगू लागला. रोबोंची सभा चालूच होती. एक रोबो भाषण देत होता नि थोड्या थोड्या वेळाने टाळ्यांचा कडकडाट केला जात होता आणि मग बघता बघता त्या भल्यामोठ्या पांढऱ्या ढगाचा रंग हळूहळू बदलू लागला. तो लालसर बनत होता. किंचित् अंधार पडू लागला होता, तरी त्याचा लाल रंग स्पष्ट दिसत होता.

'हाच तो लाल ढग!' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ म्हणाले.

'अगदी तयारीत राहा.' शास्त्रज्ञ रवी सहकाऱ्यांना सांगत होते.

आता त्या लाल ढगाभोवती चकचकीत चंदेरी किनार दिसू लागली होती. काही शास्त्रज्ञ एका सुरक्षित ठिकाणाहून त्याला बघत होते. मात्र त्यांच्या डोळ्यांची आग होत होती. क्षणात ढग अगदी गर्द लाल झाला. तो वेगाने खाली येऊ लागला आणि मग 'उँऽउँ' असा आवाज करीत त्याने रोबोंवर हल्ला चढविला. हल्ला करताना त्याच्या भोवती असलेली चंदेरी किनार तेजस्वी झाली होती. जवळजवळ सत्तर रोबो निकामी होऊन पडले होते, पण बहुसंख्य रोबोंनी त्या लाल ढगातील घटकांची माहिती लगेच कॉम्प्युटर्सना पाठविली. प्रयोगशाळेच्या आसपासचे वातावरण दम कोंदटवणारे झाले होते. तो लाल ढग त्या भल्यामोठ्या पेटीपाशी येताच शास्त्रज्ञ रवींनी त्याला आत खेचून घेण्याची सूचना दिली. लाल ढग बराच वेळ त्या पेटीवर तसाच स्थिरावला होता. अखेर प्रभावी गुरुत्वाकर्षणाने त्याला पेटीत खेचून घेण्यात शास्त्रज्ञांना यश आले. पाठोपाठ पेटीचे झाकण बंद झाले.

'वेल डन्!' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ भारतीय शास्त्रज्ञांचे अभिनंदन करीत म्हणाले. लगेच टेलीप्रिंटरवरून त्या ग्रहावरील निरनिराळ्या देशांना लाल ढग पकडला गेल्याची बातमी पाठविण्यात आली.

'लाल ढग पकडला गेला! धोका टळला!' असे टी.व्ही. वरून सांगितले जात होते.

प्रयोगशाळेतील फोनची घंटी आणखी वाजत होती. त्या ग्रहावरील निरनिराळ्या देशांच्या राष्ट्राध्यक्षांकडून भारतीय शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले जात होते. विस्कळीत झालेले जीवन पुन्हा पूर्ववत् सुरळीत सुरू झाले होते. रस्ते गजबजले होते. हॉटेल्स, दुकाने उघडली होती. थिएटर्स सुरू झाली होती. शाळा सुरू झाल्या होत्या.

सर्व शास्त्रज्ञांनी त्या लाल ढगातील निरनिराळ्या घटकांचा अभ्यास केला.

‘हा लाल ढग किरणोत्सर्गी आहे!’ शास्त्रज्ञ रवी म्हणाले.

‘पण आमच्या ग्रहावर हा आला कसा काय, हे एक कोडे आहे.’ त्यांचे शास्त्रज्ञ.

‘एखाद्या ताऱ्याच्या स्फोटातून हा निर्माण झाला असावा नि या तुमच्या ग्रहाच्या अंतर्कक्षेत खेचला गेला असावा.’ शास्त्रज्ञ नवीन.

‘शक्य आहे!’

‘एखादा स्फोटक तारा तुमच्या सूर्यमालेत आहे का?’

‘नाही.’

‘मला वाटते, आपण या लाल ढगाला निष्क्रीय करून लोकांना बघण्याकरिता काचेच्या मोठ्या पेटीत ठेवावे.’

‘गुड् आयडिया!’

‘आता या लाल ढगातील घटक माहीत झाल्यामुळे, यापुढे असे ढग आपल्याला सहज नष्ट करता येतील.’

‘ते कसे?’

‘अगदीच सोपे आहे ते.’


‘म्हणजे?’

‘या तुमच्या ग्रहाभोवती तुम्ही एक उपग्रह सतत फिरता ठेवायचा आणि असा ढग आढळताच, त्याला नष्ट करून टाकायचे.’


‘व्हेरी गुड्!’

आणि मग तो लाल ढग निष्क्रीय करून लोकांना बघण्यासाठी काचेच्या पेटीत ठेवण्यात आला. लाल ढग बघायला अलोट गर्दी जमत होती. त्या ग्रहावरील सर्वांना आता तो पाहाता येणार होता. मात्र त्याच्या भोवतीची चंदेरी किनार आता पूर्वीसारखी तेजस्वी दिसत नव्हती. सर्व वृत्तपत्रांमध्ये लाल ढगाचा फोटो छापण्यात आला होता.

***



बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २३०७ दिनांक २०/१/८०
विषय बा. वि.



# १३. फक्त एकोणतीस मिनिटे

हिरव्यागर्द वृक्षांनी वेढलेल्या त्या उंच इमारतीसमोर वेगाने येणाऱ्या कार्स थांबत होत्या. त्याच इमारतीच्या सातव्या मजल्यावर आज शास्त्रज्ञांची आंतरराष्ट्रीय मीटिंग होणार होती. दूरदूरच्या देशातील शास्त्रज्ञ येत होते. भव्य प्रवेशद्वारापाशीच भारतीय शास्त्रज्ञ त्यांचे स्वागत करीत होते. निरनिराळ्या देशांतून येणाऱ्या शास्त्रज्ञांचे स्वागत करण्यासाठी काही भारतीय शास्त्रज्ञ विमानतळावरही गेलेले होते. कार्सची-गाड्यांची सारखी ये-जा चालू होती. हॉर्नस्चे आवाज येत होते. इमारतीपुढे कार्सची रांगच्या रांग लागली होती. सर्व शास्त्रज्ञांची राहण्याची व्यवस्था सहाव्या मजल्यावर करण्यात आली होती. लिफ्ट वर-खाली जात-येत होती. त्याच इमारतीला लागून राष्ट्रीय प्रयोगशाळा होती. सर्व शास्त्रज्ञांची राहण्याची व्यवस्था येथे करण्याचे मुख्य कारण म्हणजे, ही प्रयोगशाळा शहरापासून बरीच लांब होती आणि प्रदेश निसर्गरम्य असा होता. हवाही आल्हाददायक होती. विशेष म्हणजे रहदारीचा त्रास नव्हता.

आजची मीटिंग फार महत्त्वाची होती. संपूर्ण जगाचे भवितव्य ठरणार होते. एक मोठे संकटच पृथ्वीवर ओढवू पाहात होते. पृथ्वीचा सूर्य दिवसेंदिवस वेगाने

आकुंचन पावत असल्याचे, शास्त्रज्ञांना आढळून आले होते. असे आकुंचन पावतापावता सूर्य एखाद्या बिंदुवत् होण्याची दाट शक्यता होती. संपूर्ण सूर्यमालाच कोसळणार होती. असे झाले तर सारे ग्रह अवकाशात कोठेतरी अटकले जाणार होते. त्यामुळे संपूर्ण जग या भयानक संकटाच्या दाट छायेतच अलीकडे वावरत होते. सर्वत्र खबरदारीचे वातावरण होते. दिवसेंदिवस ही समस्या बिकट होत जाणार होती. या संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग शक्यतितक्या लवकर शोधून काढणे आवश्यक होते, म्हणूनच तर शास्त्रज्ञांची ही आंतरराष्ट्रीय मीटिंग आयोजित करण्यात आली होती. साऱ्या जगाचे लक्ष या मीटिंगवर केंद्रित झाले होते. भारतानेच या बाबतीत पुढाकार घेतला होता. सारी राष्ट्रे परस्परांमधील मतभेद विसरून या महान् संकटास तोंड देण्यासाठी एकत्र आली होती. भारतीय शास्त्रज्ञ मुकेश हे या मीटिंगचे अध्यक्ष होते. प्रत्येक शास्त्रज्ञ आकुंचन पावणाऱ्या सूर्याविषयीचा आपला अहवाल सादर करणार होते. अनेक नोबेल पारितोषिक-विजेते शास्त्रज्ञही हजर राहणार होते. आता जवळजवळ सर्व शास्त्रज्ञ येऊन पोहचले होते.

'प्रवासामुळे आपण थकला असाल तेव्हा थोडी विश्रांती घ्या. नंतर मीटिंग सुरू करू या.' शास्त्रज्ञ मुकेश निरनिराळ्या देशांच्या शास्त्रज्ञांना म्हणाले.

शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेण्यासाठी पत्रकारांचे एक पथकही आलेले होते. त्यांची थांबण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती. मीटिंग संपल्यानंतर शास्त्रज्ञ त्यांना मुलाखत देणार होते. मीटिंग सुरू व्हायला हरकत नव्हती, पण रशियन शास्त्रज्ञ फ्योदर अद्याप येऊन पोहचले नव्हते. सर्वजण त्यांचीच वाट बघत होते. तेवढ्यात मुकेश यांचा एक असिस्टंट तेथे आला.

'सर, रशियाहून एक अर्जंट फोन आला आहे.' त्याने सांगितले.

'कोणाचा ?'

'शास्त्रज्ञ फ्योदर यांचा.'

मुकेश यांनी लगेच जाऊन फोन घेतला.

'हॅलो... मी शास्त्रज्ञ मुकेश बोलतो आहे.'

'गुड मॉर्निंग. मुकेश ! मी फ्योदर... आज मी येऊ शकलो नाही, त्याबद्दल सॉरी हं. माझी तब्येत जरा बरी नव्हती.'

'मग केव्हा येतोस ?'

'उद्या सकाळपर्यंत ?'

'मीटिंग लांबणीवर टाकू का ?'

'नाही, मीटिंग होऊन जाऊ द्या. मी कॅसेटस् ऐकून घेईन. माझा अहवाल मी उद्याच्या मीटिंगला सादर करीन.'

'तसे करा.'

'बरं, बेस्ट ऑफ लक् !'

'थँक्स !'

मुकेश यांनी फ्योदर यांचा निरोप सर्वांना सांगितला आणि मग सर्वजण सातव्या मजल्यावरील एका मोठ्या हॉलमध्ये जमले. या भयंकर संकटाचा ताण प्रत्येक शास्त्रज्ञाच्या हालचालीत, चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होता. तिथल्या वातावरणात एक प्रकारचा तणाव होता. एका भल्यामोठ्या गोलाकार टेबलाभोवती आता सर्वजण बसले होते. पंखे गरगरत होते. ट्यूबस्‌चा पांढरा-निळा प्रकाश हॉलमध्ये पसरला होता. प्रत्येकाने आपआपला अहवाल समोर मांडून ठेवला होता. टेबलाच्या मध्यभागी वेगवेगळ्या आकाराचे कॉम्प्युटर्स ठेवले होते. हॉलमध्येच एक मोठा पडदा टांगलेला होता. अगदी अलीकडेच सूर्याविषयी घेण्यात आलेल्या काही फिल्मस् दाखविल्या जाणार होत्या. निष्णात संख्याशास्त्रज्ञांनाही बोलाविण्यात आले होते.

अहवाल वाचून झाल्यानंतर त्यावर उलटसुलट चर्चा होत होती. प्रश्नोत्तरे होत होती. निरनिराळे तक्ते भरले जात होते. आकडेमोड केली जात होती. वेळ वेगाने जात होता. कपाळावरचा घाम पुसायलाही वेळ मिळत नव्हता. पाण्याचे ग्लास रिकामे होत होते. कॉम्प्युटर्सना माहिती पुरवून प्रश्नांची उत्तरे मिळविली जात होती. संख्याशास्त्रज्ञ आकडेमोड सादर करीत होते. कोणत्या क्षणी सूर्य बिंदूसारखा होईल, हे सांगता येत नव्हते. कमीत कमी फक्त एकोणतीस मिनिटांतही तो बिंदुवत् होऊ शकणार होता. सूर्य लहान होत जाण्याची काही निश्चित कारणे कळल्यास, हे संकट टाळण्यास फार मोठी मदत होणार होती. होता होता सर्वांचे अहवालवाचन संपले. नंतर प्रोजेक्टर चालू झाला नि अलीकडेच सूर्यावर घेतलेल्या काही फिल्मस् दाखविण्यात आल्या. सर्व शास्त्रज्ञ अतिशय काळजीपूर्वक त्या फिल्मस् बघत होते. घड्याळाकडे कोणाचेच लक्षच नव्हते. जवळजवळ पाच तास मीटिंग चालू होती. या पाच तासात त्यांना चहा-कॉफी घ्यायलाही सवड मिळाली नव्हती. कपाळावरचा घाम पुसत शास्त्रज्ञ उठले.

बाहेर अंधार पडू लागला होता. खिडक्यातून गार वाऱ्याच्या झुळका येत होत्या.

शहरातले दिवे लुकलुकत होते. सातव्या मजल्यावरील गॅलरीतून सूर्यास्ताचा रम्य देखावा दिसत होता. तो देखावा बघून मीटिंगमुळे आलेला थकवा थोडा कमी होत होता. रंगीबेरंगी ढग, निळसर टेकड्या डोळ्यांना सुखावत होत्या. ही मीटिंग तशी बरीच आशादायक ठरली होती. फ्रेंच, जर्मन, अमेरिकन शास्त्रज्ञांच्या चेहऱ्यावरून ते जाणवत होते. 'टण्ऽ टण्ऽ टण्ऽ' घड्याळात सात टोले घुमले. पहिली मीटिंग बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाल्याने सर्व शास्त्रज्ञांच्या चेहऱ्यावरील टेंशन थोडे निवळले होते. ते मोकळेपणाने गप्पा मारीत होते. उद्या दुपारी मीटिंग होती. मोकळ्या हवेत थोडा फेरफटका मारून आल्यावर त्यांना उद्याच्या मीटिंगची तयारी करायची होती. या भयानक संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधून त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी व्हायला हवी होती.

मीटिंग संपताच पत्रकारांनी शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेतल्या.

'आपण या भयंकर संकटातून पृथ्वीला वाचवू शकाल काय?' एक पत्रकार.

'अजून निश्चित असे काही सांगता येत नाही, पण आमची मीटिंग आशादायक ठरली.' जर्मन शास्त्रज्ञ.

'सूर्य असा अचानक लहान होत जाण्याचे कारण काय असावे?' पत्रकार.

'त्याचाच आम्ही शोध घेतो आहे आणि आम्हाला विश्वास आहे की, त्यात यश येईल.' मुकेश.

दुसऱ्या दिवशी सकाळी रशियन शास्त्रज्ञ फ्योदर आले. सर्व शास्त्रज्ञात एक नवे उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. फ्योदर सहा फूट उंच, गोरेपान नि धिप्पाड होते. त्यांनी दाढी राखलेली होती. त्यांचे व्यक्तिमत्त्व फारच रूबाबदार होते. आजवर त्यांनी सूर्यावर बरेच संशोधन केले होते. सर्वांनी त्यांचे स्वागत केले.

'मीटिंग दुपारी दोनला आहे.' मुकेश त्यांना सांगत होते.

'डोन्ट वरी ! तोपर्यंत मी कालच्या मीटिंगच्या कॅसेटस् ऐकून घेतो.' फ्योदर.

'चालेल ! सूर्यावरील डागांविषयी आपले संशोधन कोठवर आले आहे ?'

'ते पूर्ण झाले आहे.'

'व्हेरी गूड् !'

'आज त्यावर मी छोटसे भाषण देणार आहे.'

'फारच उत्तम !'

दोन वाजता मीटिंग सुरू झाली. निरनिराळ्या बाबींवर चर्चा होणार होती.

'मला वाटते, आपल्याला सर्वात प्रथम न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा विचार करावा लागेल.' शास्त्रज्ञ फ्योदर म्हणाले.

'नक्कीच' सर्वांनी होकार दर्शविला.

न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांतानुसार इतक्या प्रचंड वस्तुमानाच्या ताऱ्याचे गुरूत्वाकर्षण प्रचंड असते. ह्या आकर्षणाची प्रवृत्ती सूर्याचे आंकुचन घडवून आणण्याकडे असते.' मुकेश.

'आपण म्हणता ते अगदी खरे आहे.' फेंच शास्त्रज्ञ.

'ह्या प्रचंड आकषर्णाचा प्रतिकार होणे फार आवश्यक असते आणि समजा तसे झाले नाही, तर सूर्य आकुंचन पावत जाऊन अगदी अल्पशा कालातच एखाद्या बिंदूसारखा होईल. तो अल्पसा काळ फक्त एकोणतीस मिनिटे असेल.' फ्योदर.

'मग यापूर्वी सूर्य आंकुचन न पावता अल्पावधी वर्षे आपला आकार कसा काय टिकवून ठेवू शकला ? म्हणजे प्रचंड आकर्षणाचा प्रतिकार योग्य प्रकारे होत नाही असे म्हणता येईल ना?' अमेरिकन शास्त्रज्ञांनी विचारले.

'यापूर्वी सूर्य त्याचा आकार टिकवू शकला त्याचे कारण म्हणजे त्यामध्ये असलेले दाब गुरुत्वाकर्षणाचा समर्थपणे प्रतिकार करीत होते.'

'म्हणजे आता हे दाब कमी प्रमाणात निर्माण होत असावेत.' जर्मन शास्त्रज्ञ.

'अगदी बरोबर.'

'सूर्यावरील वाऱ्यांच्या अभ्यासाचा आपल्याला या ठिकाणी निश्चित उपयोग होऊ शकेल.' फ्रेंच शास्त्रज्ञांनी मत मांडले.

'हो, खात्रीने.'

फ्रेंच शास्त्रज्ञांनी सौर वाऱ्यावरील आपला छोटा पेपर वाचला. नंतर सूर्यावरील डागांविषयी फ्योदर यांचे भाषण झाले.

ही मीटिंग जवळजवळ चार तास चालली. मात्र सूर्य लहान होत जाण्याचे निश्चित कारण शोधून काढण्यास शास्त्रज्ञांना अजून यश येत नव्हते, पण मीटिंग आशादायक नक्कीच ठरली होती. चहा-कॉफी घेतल्यानंतर शास्त्रज्ञ जरा मोकळ्या हवेत फेरफटका मारून येण्याकरिता बाहेर पडले. त्यावेळी त्यांची चर्चा चालूच होती.

शास्त्रज्ञ मुकेश आणि फ़्योदर बोलता बोलता बरेच दूरवर निघून गेले होते. रस्ता अगदी सामसूम होता. अंधार पडू लागला होता. रस्त्यावर मर्क्युरी लॅम्प्सचा

निळसर गुलाबी प्रकाश पडला होता. चांदण्याही लुकलुकू लागल्या होत्या.

'सर्यावरील उद्रेकांविषयी आपले काय मत आहे ?' फ्योदर यांनी विचारले.

'उपगृहाकडून आपल्याला त्याविषयी बरीच माहिती मिळाली आहे. त्या संकटावर मात करण्याकरिता त्या माहितीचा नक्कीच उपयोग होणार.' मुकेश.

'उद्याच्या मीटिंगमध्ये आपल्याला निश्चित अशा निष्कर्षाप्रत पोहचायला हवे.'

'हो तर !'

बोलता बोलता ते प्रयोगशाळेपाशी केव्हा येऊन पोहचले, हे त्यांचे त्यांनाच कळले नाही. त्या रात्री जवळजवळ सर्वच शास्त्रज्ञ अभ्यासात गढून गेले होते.

सूर्य आकुंचन पावत जाण्याचे निश्चित कारण तरी काय असावे, याच विचारात शास्त्रज्ञ मुकेश गढून गेले होते. अस्वस्थपणे ते त्यांच्या अभ्यासिकेत येरझाऱ्या घालीत होते. त्यांना झोप येतच नव्हती. मग ते गॅलरीत जाऊन उभे राहिले. गार वारा सुटला होता. पानांची सळसळ त्या शांत वातावरणात स्पष्ट ऐकू येत होती. गॅलरीसमोरचा रस्ता लांबच लांब गेलेला होता. सर्वत्र शांत होते. चंद्राच्या शीतल प्रकाशात त्यांना हायसे वाटले. ते मग अभ्यासिकेत गेले व वाचनात गढले. 'टण् ऽ टण ऽ टण् ऽ' तीनचे टोल पडले. ते जागेच आहेत, हे बघून त्यांचा घरगडीही झोपला नव्हता. त्यांच्यावर असणारे टेंशन त्याच्या नजरेतून सुटले नव्हते. त्यांना चहा वगैरे द्यावा का, म्हणून विचारायला तो त्यांच्या अभ्यासिकेत गेला. टेबललँपचा प्रकाश खोलीत पसरला होता. ते वाचनात नि नोटस् काढण्यात इतके गढून गेले होते की तो केव्हा त्यांच्यापाशी जाऊन उभा राहिला, हेही त्यांना कळले नाही.

'काय रे सदू ?'

'साहेब, चहा करून आणू ?'

'बरं आण. अरे, पण तू का जागत बसला ?'

'साहेब, सूर्य लहान होत चालला आहे; हे खरे का ?'

'हो, खरे आहे ते.'

सदूने चहा दिला नि तो गेला.

रात्रभर शास्त्रज्ञ मुकेश सूर्याच्या तपमानावरच विचार करीत होते आणि अ… ते एका महत्त्वाच्या निष्कर्षाप्रत पोहचले. उद्याच्या सभेत ते आपले मत मांड… होते.

आणि मग तिसरी मीटिंग सुरू झाली.

'सूर्याच्या केंद्रस्थानी कितीतरी कोटी अंश सें. तपमान असते. मग अलीकडे या केंद्रस्थानाच्या तपमानात प्रंचड घट होत आहे नि अणुगर्भाचा संयोग घडून निर्माण होणारी ऊर्जा निर्माण होत नाही.' शास्त्रज्ञ मुकेश आपला विचार ठामपणे मांडत होते.

'मग?'

'त्यामुळे गुरुत्वाकर्षणाचा प्रतिकार करण्यासाठी जे दाब निर्माण व्हायला हवेत, ते होत नाहीत.'

'आपले म्हणणे अगदी बरोबर आहे.' शास्त्रज्ञांनी होकार दर्शविला.

'अणुसंयोगाने हायड्रोजनचे हेलियममध्ये रूपांतर होत असते, ते होत नाही.'

'हो, कारण त्यातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेतूनच सूर्य आपला आकार स्थिर ठेवू शकतो' फ्योदर.

'सूर्यावरील प्रारणात क्ष-किरणाहून भेदक असे गॅमा-किरण असतात. ते महत्त्वाचे ठरतात. त्यांचा अभ्यास व्हायला हवा.' फ्रेंच नि जर्मन शास्त्रज्ञ म्हणाले.

'निश्चितच व्हायला हवा. तसेच सूर्यावरील वस्तुकणात विद्युत्भारित कण अणि विद्यूत्भारीत नसलेले कण, यांचाही अभ्यास महत्त्वाचा ठरतो.' अमेरिकन शास्त्रज्ञ म्हणाले.

'सूर्याच्या लहान होत जाण्याचे कारण आता स्पष्टच झाले आहे, तेव्हा त्याच्या केंद्रस्थानी असणारे तपमान कसे वाढविता येईल, याचाच आपल्याला विचार करायला हवा.'

'खरे आहे.'

आणि मग लवकरच सूर्याच्या केंद्रस्थानाचे तपमान वाढविण्याचा मार्ग शोधून काढण्यात शास्त्रज्ञांना यश आले. मात्र सूर्याच्या केंद्रस्थानी सध्या असलेल्या तपमानात वाढ घडवून आणणे वाटते तितके सोपे नव्हते. त्यासाठी फार मोठी मोहीम हाती घ्यावी लागणार होती. सूर्याच्या केंद्रावर एका विशिष्ट किरणांचा काही काळ सतत मारा केल्यास, तेथील तपमानात वाढ घडवून आणणे शक्य होणार होते, पण किरणांचा असा मारा वेगवेगळ्या कोनांतून होणे आवश्यक होते. ही योजना शक्य तितक्या लवकर राबवावी लागणार होती, कारण सूर्य केव्हाही एकोणतीस मिनिटांत बिंदूसारखा होऊ शकणार होता नि मग सर्व शास्त्रज्ञांनी मोहीम आखण्याचे ठरविले.

‘आपल्या या सूर्यमालेतील जवळजवळ प्रत्येक ग्रहावर आपल्याला जावे लागणार.’ मुकेश शास्त्रज्ञांना सांगत होते.

‘पण ते कसे काय शक्य होणार?’ शास्त्रज्ञ आणि अंतराळवीरांनी विचारले.

‘ज्या ग्रहांवर उतरणे शक्य नाही, त्या ग्रहांच्या चंद्रावर उतरायचे.’

‘शुक्रावरचे ढगांचे आवरण भेदण्यात आपल्याला सहज यश येईल.’ फ्योदर.

‘प्लुटोचे काय?’ फ्रेंच नि जर्मन शास्त्रज्ञांनी विचारले.

‘मला वाटते तो ग्रह आपल्याला वगळावा लागणार. सूर्यापासून सर्वात दूर असल्याने किरणांचा माराही तेथून प्रभावी ठरणार नाही.’ मुकेश.

प्लुटो वगळून इतर सर्व ग्रहांवर जाण्यासाठी याने तयार केली गेली. काही ग्रहांवर यंत्रमानव असणारी याने पाठविली जाणार होती. अशा यानांवरच्या कॉम्प्युटर्सना आवश्यक ती सारी माहिती व सूचनाही देण्यात आल्या होत्या. त्यांच्याद्वारे यंत्रमानव कार्यान्वित केले जाणार होते. सूर्याच्या केंद्रावर मारा करण्यासाठी निर्माण केलेल्या किरणांची चाचणी घेतली गेली. सूर्याभोवती दहा लाख किलोमीटर लांब नि पंधरा लाख किलोमीटर रूंद, असे धूलिकण व इतर काही घटकांचे दाट आवरण असल्याने, त्या आवरणाला छेदूनच त्या तपमानवर्धक किरणांना जायचे होते. जगातील बहुतेक सर्वच देशांनी या मोहिमेत भाग घेतला होता. तसेच सढळ हातांनी आर्थिक मदतही केली होती.

अखेर ठरलेल्या दिवशी नि ठरलेल्या वेळी सारी याने अवकाशात झेपावली. आपल्या सूर्यमालेतील निरनिराळ्या ग्रहांच्या दिशेने ती निघाली होती. ही याने जवळजवळ प्रकाशाच्या वेगाने जात होती. प्रत्येक ग्रहावर ठरल्याप्रमाणे यान उतरल्याचा संदेश आता पृथ्वीवर पाठविला गेला होता. यंत्रमानव असणाऱ्या यानाला शुक्रावरचे ढगाळ आवरण भेदण्यात यश आले होते. सूर्याचा आकुंचनाचा वेग मोजण्याचे काम सतत चालूच होते. शुक्रावर सर्वत्र रखरखीत वाळवंटच होते. काही काही ठिकाणी गर्द तांबडे भाजून काढल्यासारखे खडक होते. ॲसिडचे ढग तरंगत होते. बुधावर तर शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांना ढगांचे काही विचित्र पुंजके आढळले. ते क्षणात विरून जायचे, तर क्षणात पुन्हा अवतरायचे. सर्वात आश्चर्यचकित करणारी गोष्ट म्हणजे मंगळावर पृथ्वीवरील पिरॅमिडसारखे काही पिरॅमिड्सचे अवशेष आढळले. गुरुवर प्रचंड आकाराच्या काही तबकड्या आढळल्या. इतर काही ग्रहांवर मुंग्यांसारखे काही कीटक होते.

सूर्यावर तपमानवर्धक किरणांचा मारा करण्यासाठी पृथ्वीवर एक प्रचंड अशी यंत्रणाच उभारण्यात आली होती. त्या किरणांचा मारा केव्हा नि कसा करायचा, हे त्या त्या ग्रहाच्या सूर्यापासूनच्या अंतरावर अवलंबून राहणार होते. तपमानवर्धक किरणांचा हा मारा निरनिराळ्या कोनांतून करावयाचा होता, कारण या प्रक्रियेत थोडीशी चूक झाली तरी सूर्यावरील वाऱ्यांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता होती. तसेच एखादा मोठा स्फोटही होऊ शकणार होता.

आता प्रत्येक ग्रहावरून सूर्याच्या केंद्राकडे ते किरण सोडले जाऊ लागले होते. सूर्याच्या अवतीभवतीच्या वातावरणाला छेदून ते किरण जात होते. प्रत्येक ग्रहावरून किती तास मारा करायचा, हे सूचना देऊन सांगण्यात येत होते. निरनिराळ्या ग्रहांवरून निघणारे हे किरण वेगाने सूर्याच्या केंद्रस्थानाकडे जात होते. आदळत होते. सूर्याच्या तपमानाचा त्या किरणांवर काहीच परिणाम होतो. वेगवेगळ्या कोनांतून ते किरण येत होते नि केंद्रात शिरत होते. पृथ्वीवरून होणारा मारा फार प्रभावी होता. ही प्रक्रिया कितीतरी टप्प्यांत विभागलेली होती. शास्त्रज्ञ नि अंतराळवीर या कार्यात अगदी गढून गेले होते.

'मला वाटते आपली ही मोहीम यशस्वी होणार.' मुकेश.

'हो, तशी खात्री तर आहेच.' फ्योदर.

'सूर्याच्या आकुंचनाचा सध्याचा वेग मोजल्याशिवाय निश्चित असे काही सांगता येणार नाही.' अमेरिकन शास्त्रज्ञ.

'यू आर राईट !'

'तो वेग मंदावणे फारच आवश्यक आहे.' मुकेश.

'नक्कीच.'

'मग लवकरच सूर्याच्या आकुंचनाचा वेग पुन्हा मोजण्यात आला. त्यात लक्षणीय घट झाली होती. नंतर केलेल्या निरीक्षणात शास्त्रज्ञांना दिसून आले की, सूर्याच्या केंद्रस्थानाचे तपमान हळूहळू पूर्ववत् होत आहे. अशा ऊष्ण ठिकाणी अणुगर्भाचा संयोग होऊन ऊर्जा निर्माण होत होती.

'आता हायड्रोजनचे हेलियममध्ये रुपांतर होण्यास काही अडथळा होणार नाही.' मुकेश आपल्या सर्व सहकाऱ्यांना सांगत होते.

'निश्चितच.'


आणि मग सूर्य पूर्ववत् झाला. पृथ्वीवरचे मोठे संकट टळले होते. सर्वत्र आनंदी

नि उत्साही वातावरण होते. जगातील सर्व देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले होते.

'तरी आता आपला सूर्य ह्या अवस्थेत किती वर्षे राहू शकेल?' शास्त्रज्ञांनी फ्योदर यांना विचारले.

'काही काळजी करू नका. हजार वर्षे तो असा राहील.' फ्योदर हसत म्हणाले.

म. पं. सं. छात्रे, वाचनालय कल्याण.
बाल वाङ्मय विभाग.
ना. क्र. ........ दिनांक ......
विषय..... क्र. ........





# १४. चंद्र कुणाचा?

शास्त्रज्ञ अनिकेत त्यांच्या अभ्यासिकेत वाचनात गढलेले होते. उद्या त्यांचे एका कॉलेजमध्ये व्याख्यान होते. संध्याकाळ व्हायला आली होती. दूरवरच्या टेकड्यांपलीकडे जाणारा सूर्य दिसत होता. लालसर, करड्या-जांभळ्या ढगांतून प्रकाशकिरण फाकत होते. खिडक्यांच्या काचांतून येणाऱ्या तांबूस प्रकाशाने सारी अभ्यासिका उजळून निघाली होती. गार वाऱ्याच्या मंद झुळुका येत होत्या. तेवढ्यात एक महत्त्वाची मीटिंग आटोपून शास्त्रज्ञ दिनेश त्यांच्याकडे आले.

'कशी काय झाली मीटिंग?' अनिकेतांनी त्यांना विचारले.

'छान झाली.' दिनेश कपाळावरचा घाम पुसत खुर्चीत बसत म्हणाले.

'चहा घेणार ना?'

'चालेल.'

'नंतर जरा मोकळ्या हवेत फेरफटका तरी मारून येऊ.'

'जरूर.'

चहा घेऊन ते निवांतपणे गप्पा मारीत बसले.

'नुकताच आकाशगंगेत अनेक प्रकाशवर्षे दूर असणाऱ्या एका वस्तूचा शोध लागला आहे.' दिनेश.

'महत्त्वाचाच शोध म्हणावा लागेल.'

'हो ना, यातूनच विश्वाच्या निर्मितीचे रहस्य उलगडू शकेल.'

'निश्चितच! अज्ञात वस्तूपासून निघणारा प्रकाश येथे पोहचायला किती वर्षे लागली, त्यावरून पृथ्वीपासूनचे तिचे अंतरही ठरविता येईल.'

'खरे आहे.'

'ट्रिंग sट्रिंग s' दारावरची बेल वाजली.

'अगं, बघ तरी कोण आहे!' अनिकेत त्यांच्या पत्नीला म्हणाले.

'अहो, तुमचे असिस्टंट आलेत प्रयोगशाळेतले.'

'आतच पाठव त्यांना.'

'काय म्हणता मि. देशपांडे?'

'सर, आपण लगेच प्रयोगशाळेत चला.'

'का?'

'थोड्या वेळापूर्वीच एका ग्रहावरून संदेश आला आहे.'

'काय म्हणता !'

'थोड्या वेळाने ते पुन्हा संपर्क साधणार आहेत.'

'आपल्याला लगेच प्रयोगशाळेत जायला हवे.' अनिकेत म्हणाले.

'काही वर्षांपूर्वी आपण रेडिओॲक्टिव्हद्वारा अनेक ग्रहांकडे संदेश पाठविले होते. त्यांपैकी प्रगत जीवसृष्टी असणाऱ्या एखाद्या ग्रहाकडून त्याला उत्तर आले असावे.'

'अगदी शक्य आहे.'

ते प्रयोगशाळेत पोहचले तेव्हा किंचित् अंधार पडला होता. संदेश केव्हा येतो याचीच ते वाटच बघत होते. तेवढ्यात 'किट् s किट् s कट् s' असा आवाज त्या शांत वातावरणात पसरला नि संदेश येण्यास सुरुवात झाली.'

'हॅलो s हॅलो s पृथ्वीच का?'

'हो, पृथ्वीच, पण आम्ही पृथ्वीवरून बोलत आहोत, हे आपणास कसे कळले?' शास्त्रज्ञ अनिकेतांनी विचारले.

'तुमच्या सूर्यमालेतील बहुतेक सर्व ग्रहांचे आम्ही निरीक्षण केले आहे आणि

आम्ही आता जो संदेश देणार आहोत, तो फार महत्त्वाचा आहे.'

'काय ते तरी सांगा?' दिनेश.

'हे पाहा, पृथ्वीभोवती जो उपग्रह फिरतो आहे. ... म्हणजे चंद्र, तो तुमचा नाही नि पूर्वीही नव्हता.'

'काय?'

'तो चंद्र तुमचा नाही. तुमच्या सूर्यमालेतलाच नाही.'

'म्हणजे?'

'तो आमचा आहे.'

'ते शक्य नाही.'

'ही माहिती तुम्हाला धक्कादायक वाटणार, हे अपेक्षितच होते.'

'तुम्हाला म्हणायचे तरी काय आहे?'

'हेच, की तो चंद्र आमचा आहे. तेव्हा आम्हाला त्याची अत्यंत निकड भासत असल्याने, तो परत करावा, ही विनंती.'

'तुम्ही कोठून बोलत आहात? नि हा चंद्र तुमचा आहे, हे कशावरून?'

'आम्ही पृथ्वीपासून बऱ्याच दूर असणाऱ्या सूर्यमालिकेतील एका ग्रहावरून बोलत आहोत. आमच्या अवकाशसंशोधन-यानाने नुकतीच एक मोहीम पूर्ण केली आहे नि त्यावरून आम्हाला कळले की, हा तुमचा चंद्र फार फार पूर्वीचा आमच्याच सूर्यमालिकेतील ग्रह आहे. एवढेच नाही तर आम्ही हे सिद्धही करून दाखवू शकतो. तुम्ही आता एकच गोष्ट करायची आणि ती म्हणजे पृथ्वीवरील शास्त्रज्ञांची एक अर्जट मीटिंग घेऊन त्यांना हा संदेश सांगायचा. तेव्हा कृपा करून तयारीला लागा. तीन दिवसांनी आम्ही पृथ्वीवर येऊ. आम्ही तुमचे शत्रू नाही. त्या चंद्राची अत्यंत निकड भासत असल्यामुळे आम्ही तो आपणाकडे मागत आहोत. मग करता ना शास्त्रज्ञांची मीटिंग ॲरेंज?'

'ठीक आहे.'

'थँक्स! आम्ही येतच आहोत.'

'किट्ऽकिट्ऽ' असा होणारा आवाज थांबला. संदेश येणे थांबले. हा प्रकार तरी काय आहे, हेच शास्त्रज्ञाना कळत नव्हते, पण काहीही झाले तरी तो संदेश निरनिराळ्या देशातील शास्त्रज्ञांना सांगणे आवश्यकच होते. लगेच संपर्क साधून तो संदेश सर्व देशांतील शास्त्रज्ञांना कळविण्यात आला. सर्वांनाच आश्चर्याचा

धक्का बसला. ताबडतोब मीटिंग घ्यायचे ठरले. प्रयोगशाळेपासून थोड्या अंतरावर असणाऱ्या टेकड्यांच्या पायथ्याशी यान उतरवावे, असे शास्त्रज्ञ दिनेश यांनी त्या परग्रहावरील माणसांना सांगितले होते.

त्या दिवशी प्रयोगशाळेच्या भव्य इमारतीपुढे गाड्यांची नुसती रांगच लागली होती. निरनिराळ्या देशांतील निष्णात शास्त्रज्ञ येत होते. भारतीय शास्त्रज्ञ त्यांचे स्वागत करीत होते. तो संदेश कोणत्या ग्रहावरून आला असावा, त्या ग्रहावरील माणसे कशी असतील, खरेच ते म्हणतात त्यात काही तथ्य असेल का? असे कितीतरी प्रश्न सर्वांना पडले होते. प्रयोगशाळेतील एका भव्य हॉलमध्ये एका गोलाकार टेबलाभोवती सारे बसले होते. चर्चा करीत होते.

संध्याकाळ झालेली होती. अंधार पडू लागला होता. गार वाऱ्याच्या झुळुका खिडक्यांतून आत येत होत्या. रस्त्यांवर ट्यूबस् प्रकाशू लागल्या होत्या. सारे त्या परग्रहावरील माणसांची वाट बघत होते नि त्यांना पाहायलाही ते उत्सुक होते. आता अंधार वाढू लागला होता. गारवा जाणवू लागला होता. प्रयोगशाळेपासून थोड्याच अंतरावर असणाऱ्या टेकड्या अंधारात गुरफटल्या गेल्या. त्यांच्या सांगण्यानुसार तीन दिवस होऊन गेले होते. बहुतेक ते येणार नाहीत असेच सर्वांना वाटू लागले होते. तेवढ्यात अचानक अंधुक दिसणाऱ्या टेकड्यांवर तेजस्वी प्रकाशझोत पसरला.

'बहुतेक आलेत!' अनिकेत म्हणाले आणि मग तो प्रकाशझोत दिसेनासा झाला. थोड्याच वेळात प्रयोगशाळेवर निळसर-तांबडे प्रकाशझोत टाकणारी तबकडी घिरट्या घालू लागली. पाठोपाठ सोनेरी रंगाची, चार फूट उंचीची, चमकदार डोळ्यांची चार माणसे मोठ्या हॉलमध्ये दाखल झाली. ती माणसे हॉलमध्ये येताच वातावरणात वेगळाच सुगंध दाटला. प्रत्येक माणसाच्या कपाळावर एक छोटा लालसर दिवा होता 'टिं ऽ ट् टिं ऽ ट्' असा आवाज होऊन तो लागत-विझत होता.

'सॉरी हं!' जरा उशीरच झाला. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला. त्यांनी सर्वांना नमस्कार केला. शास्त्रज्ञांनी त्यांना गोलाकार टेबलाभोवती बसायला सांगितले आणि चर्चा चालू झाली.

'तर मग तुमचे म्हणणे असे आहे, की पृथ्वीचा चंद्र हा तुमच्या सूर्यमालिकेतील ग्रह आहे.' शास्त्रज्ञांनी त्यांना विचारले.

'हो, आणि आम्हीही सिद्ध करून दाखवू शकतो.' विचित्र हातवारे करीत ती माणसे म्हणाली.

'ते कसे?'

आणि मग ती परग्रहावरची चारही माणसे सांगू लागली. त्यांचा आवाज पोकळ नळकांड्यातून आल्यासारखा वाटत होता. अधूनमधून त्यांच्या डोळ्यांतून तेजस्वी किरण फाकत होते. कपाळावरचे लाल दिवे लागत-विझत होते.

'हे पाहा, फार फार पूर्वी आमच्या सूर्यमालेत एकंदर अठरा ग्रह होते. हा पृथ्वीचा चंद्र सूर्यापासून सर्वात दूर होता. अचानक आमच्या सूर्याच्या गुरुत्वाकर्षणात किंचित् बदल घडून आला आणि हा ग्रह सूर्यमालेतून निखळला. गेली हजारो वर्षे आम्ही त्याचा शोध घेत होतो, पण तो सापडला नाही. अवकाशात अडकल्यामुळे तो एखाद्या ग्रहावर किंवा ताऱ्यावर आदळून नष्ट झाला असावा, असे आम्हाला वाटले. मात्र अलीकडेच अवकाशसंशोधन करीत असताना तो दिसून आला. त्याची ओळख पटली. हाच आमचा अठरावा ग्रह आहे, असे आमच्या शास्त्रज्ञांचे ठाम मत झाले आहे. आता आमच्या सूर्याचे गुरुत्वाकर्षण पूर्ववत् झाले आहे, तेव्हा हा ग्रह आम्हाला हवा आहे.'

'पण सुरुवातीला पृथ्वी एक धगधगत्या वायूंचा गोळा होता. पृथ्वीची स्वत:भोवती फिरण्याची गती इतकी प्रचंड होती की, फक्त चार तासांतच तिचे परिवलन पूर्ण व्हायचे. अशा अवस्थेत एक गोळा पृथ्वीपासून तुटून दूर आला नि तो स्वत:भोवती व पृथ्वीभोवती फिरू लागला. तो गोळा म्हणजेच आमचा चंद्र, असे आमच्या शास्त्रज्ञांचे मत आहे.' शास्त्रज्ञांनी सांगितले.

'मग आमच्या मते हा सिद्धांत तितकासा योग्य नाही.'

'म्हणजे?'

'आम्ही मघाच सांगितले आहे की, हा चंद्र म्हणजे आमच्या सूर्यमालेतून निखळून पडलेला ग्रह आहे. अवकाशात फिरत असतानाच हा तुमच्या सूर्यमालेत शिरला आणि पुढे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणात ओढला गेला. चंद्र आमच्याच सूर्यमालेतील असल्याने त्याच्याबाबत ज्या गोष्टी तुम्हाला अजूनही माहीत नाहीत, त्या आम्हाला ज्ञात आहेत. तसेच आमच्या सूर्यमालेचा जर तुम्ही अभ्यास केला, तर त्यातील एक ग्रह निखळून गेल्याचे सहज लक्षात येईल. तेव्हा असे करूया, आपण प्रथम चंद्रावर जाऊ नि नंतर आमच्या ग्रहावर. तुमची पूर्णपणे खात्री पटली तरच चंद्र द्या, कारण तुमच्या सहकार्याशिवाय तो आम्ही आमच्या सूर्यमालेत नेऊ शकत नाही.' ती चारही माणसे शास्त्रज्ञांना समजावून सांगत होती.

'मग केव्हा निघायचे?' अनिकेतांनी विचारले.

'शक्य तितक्या लवकर.'

'तुम्ही थोडी विश्रांती घ्या. दोन-तीन तासात निघू या.'

'चालेल.'

'तरी आम्हाला परतायला किती दिवस लागतील?' शास्त्रज्ञ दिनेश.

'पाच दिवसांनी आम्ही तुम्हाला येथेच आणून सोडू.'

जवळजवळ मध्यरात्र झाली होती. प्रयोगशाळेच्या आजूबाजूचा सारा परिसर धुक्यात गुरफटू लागला होता. इतर देशातील काही शास्त्रज्ञ नि दोन भारतीय शास्त्रज्ञ त्या चार फुटाच्या सोनेरी रंगाच्या माणसांसोबत जाणार होते.

'तर मग आता निघायला हवे.' ती माणसे म्हणाली.

आणि मग सर्वजण त्या उडत्या तबकडीत बसले नि लवकरच टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या गर्द तांबड्या रंगाच्या यानापाशी पोहचले. हिरवा, निळा मंद प्रकाश असणाऱ्या नियंत्रणकक्षात ते गप्पा मारीत बसले होते.

यान चंद्रावर उतरले. चंद्राच्या पृष्ठभागाखाली पाणी आढळले, पण ते बर्फरूपात होते. आता ते चंद्रावर फेरफटका मारीत होते.

'पूर्वी आमच्या या ग्रहाला आम्ही उल्कांचा ग्रह म्हणत असू, कारण चंद्रपृष्ठावर सूक्ष्म उल्का सारख्या कोसळत.' त्या चार माणसांपैकी एकाने तिथल्या धुळीत हात घातला व काचेच्या मण्यासारखा एक गोलक त्यांना काढून दाखविला.

'आता फक्त एक दिवसात आपण आमच्या ग्रहावर पोहचू.' ती माणसे शास्त्रज्ञांना सांगत होती. रंगीबेरंगी तारकासमुहांतून यान जात होते. पृथ्वीवरील शास्त्रज्ञांना घेऊन लवकरच आम्ही येत आहोत- असा संदेश त्या माणसांनी त्यांच्या ग्रहावर पाठविला होता.

यान त्या ग्रहावर उतरले तेव्हा अनेक शास्त्रज्ञ त्यांच्या स्वागतासाठी हजरच होते. त्या ग्रहावरील आकाश गर्द निळ्या रंगाचे होते नि गुरुत्वाकर्षण पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षणाच्या जवळजवळ दीडपट होते. 'सूंऽसूंऽ' असा आवाज करीत जोरदार वारे वाहात होते. सर्वत्र उंच उंच इमारती दिसत होत्या.

'आता थोडी विश्रांती घ्या. मग आमच्या सूर्यमालेचा अभ्यास करण्याकरिता आवश्यक ते सर्व साहित्य आम्ही तुम्हाला पुरवूच.'

'थँक्स!' अनिकेत.

'आणि हो, अभ्यास होताच तसे सांगा म्हणजे या ग्रहावरील काही निष्णात शास्त्रज्ञांची मीटिंग घेऊ.'

'ती कशाला?' शास्त्रज्ञ दिनेश.

'शंकांचे निरसन होण्यासाठी.'

'ठीक आहे.'

त्यांच्या सूर्यमालेचा अभ्यास करणे म्हणजे काही सोपे काम नव्हते. भारतीय शास्त्रज्ञ नि इतर देशातील शास्त्रज्ञ तहान-भूक विसरून त्या अभ्यासात गढून गेले होते. फार मोठी जबाबदारी आता त्यांच्यावर होती. रात्रभर जागे राहावे लागत होते. त्यांच्या सूर्यमालेच्या नकाशांचे निरीक्षण, वाचन करावे लागत होते. सूर्यमालेविषयी माहिती असणारी अनेक अतिप्राचीन पुस्तके वाचावी लागत होती. अनेक संदर्भ शोधून काढावे लागत होते. सूर्यापासून सर्वात दूर असणाऱ्या त्या आठव्या ग्रहाची अनेक वैशिष्ट्ये होती. त्यांची तुलना पृथ्वीच्या चंद्राशी करून पाहावी लागत होती. चंद्राच्या उत्पत्तीविषयीच्या अनेक सिद्धांतांवर चर्चा करावी लागत होती. वेळोवेळी वेधशाळेत जाऊन त्यांच्या सूर्यमालेतील ग्रहांच्या स्थितीचे निरीक्षण करावे लागत होते. दिवसभर स्वतःला एका मोठ्या हॉलमध्ये कोंडून घेण्यासारखेच ते होते.

'मला वाटते, आपला चंद्र हा यांच्याच सूर्यमालेतील ग्रह असावा.' शास्त्रज्ञ अनिकेत.

'हो, तसा पुरावाही आपल्याला या अभ्यासातून सापडला आहे.' सर्वांनी होकार दर्शविला.

'आपल्या ह्या निष्कर्षातून पॅट्रिक मूरच्या सिद्धांताला पुष्टीच मिळते.' शास्त्रज्ञ दिनेश.

'कदाचित् आपल्या सूर्यमालेत प्रवेशल्यानंतर चंद्र पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणात खेचला गेला असावा.'

मात्र काहीही असले तरी चंद्र परत करणे, तितके सहज सोपे नव्हते. चंद्र पृथ्वीवरील जीवनाचे एक अविभाज्य अंग बनले होते. पृथ्वीपासून त्याला दूर केले, तर काही अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता होती.

ठरल्याप्रमाणे मीटिंग झाली. शास्त्रज्ञ अनिकेत यांनी त्या ग्रहावरील माणसांना त्यांचे पृथ्वीच्या चंद्राबाबतचे म्हणणे बरोबर असल्याचे सांगितले.

'पण आपण चंद्र नेणार कसा? आणि तो हवा आहे कशाला?' शास्त्रज्ञांनी

त्यांच्या शास्त्रज्ञांना विचारले.

'ते सोपे आहे.'

'म्हणजे?'

'तुम्ही प्रतिगुरुत्वाकर्षणाने चंद्र सूर्यमालेबाहेर ढकलून द्यायचा. नंतर तो आम्ही आमच्या सूर्यमालेत घेऊन जाऊ.'

'पण चंद्र कोणत्या कारणासाठी हवा आहे?'

'अवकाशसंशोधनाची आमची एक मोठी मोहीम आहे. त्यासाठी आम्ही चंद्रावर वेधशाळा उभारून अनेक ग्रहताऱ्यांचे निरीक्षण करून अभ्यास करणार आहोत. याचे मुख्य कारण म्हणजे धुळीचे कण, ढग, वादळ यांचा व्यत्यय निरीक्षणात येणार नाही. तसेच चंद्रावर कोसळणाऱ्या उल्कांचाही अभ्यास आम्हाला करायचा आहे. त्यातून अनेक गोष्टींचा उलगडा होऊ शकेल.'

'मग असेच का करीत नाही...'

'काय?'

'चंद्रावर वेधशाळा काढण्यास आम्ही तुम्हाला परवानगी देतो.'

'खरेच?'

'हो, एवढेच नाही तर आपण परस्परांना सहकार्याचा हात देऊन चंद्रावर काही कारखानेही काढू. अनेक दुर्मिळ खनिजे चंद्रावर मिळू शकतील. हा करार तुम्हाला निश्चितच आवडेल.'

'व्हाय नॉट, शुअर!'


पृथ्वीवरील शास्त्रज्ञांनी केलेल्या कराराबद्दल त्या ग्रहावरील सर्वांनी त्यांचे स्वागत केले. त्यांनी पृथ्वीवरील माणसांना अनेक शुभेच्छा पाठविल्या.

आणि बरोबर पाच दिवसांनंतर मध्यरात्री प्रयोगशाळेपासून थोड्याच अंतरावर असणाऱ्या टेकड्यांच्या पायथ्याशी यान उतरले. उडत्या तबकड्यांतून त्या ग्रहावरील माणसांनी त्यांना प्रयोगशाळेत आणून सोडले.

'आता आपण मित्रच आहोत' ते म्हणाले नि मग निळसर-लालसर प्रकाशझोत टाकत यान आकाशात झेपावले.

शास्त्रज्ञ अनिकेत व दिनेश प्रयोगशाळेच्या गॅलरीत उभे होते. चंद्राचा शीतल प्रकाश पडला होता. दोघेही कुतूहलाने चंद्राकडे बघत होते.

***



# १५. कट

वृत्तपत्राच्या पहिल्याच पानावरील अगदी ठळक अक्षरातल्या त्या दोन्ही बातम्या तशा धक्कादायकच होत्या-

विध्वंसक कृत्य करणारी एक अज्ञात व्यक्ती सध्या शहरात वावरत आहे! अजूनपर्यंत त्या व्यक्तीला कोणीही पाहिले नव्हते. विद्युत्केंद्रात स्फोट घडवून आणणे, टेलिफोन्सचे खांब वाकवून टाकणे यासारख्या गोष्टी ती करीत होती. ती व्यक्ती मानसिक रुग्ण असावी, असाही अंदाज व्यक्त करण्यात येत होता. त्या व्यक्तीची माहिती देणाऱ्यास किंवा तिला पकडून देणाऱ्यास पन्नास हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले होते. पोलीस-तपास चालू होताच; पण त्यांना यश येत नव्हते.

दुसरी बातमी होती- शहरात मुले पळविणारी टोळी असल्याची. गेल्या दोन दिवसात जवळजवळ पंचवीस मुले बेपत्ता झाली होती. शाळकरी मुले अशी अचानक बेपत्ता झाल्याने शहरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. बेपत्ता झालेल्या मुलांचा तपास चालू होता.

प्रा. जोशींनी पेपर वाचून टीपॉयवर ठेवला नि घड्याळाकडे नजर टाकली. सात वाजले होते. मुले अभ्यास करीत होती. ते मग प्रयोगशाळेत जायच्या तयारीला लागले.

एक महत्वाची सूचना ... रेडिओवरून सांगितले जात होते- 'नुकतीच शहरात मुले पळविणारी एक टोळी दाखल झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तेव्ह पालकांनी मुलांना शाळेत सोडून परत घेऊन येण्याची व्यवस्था करावी. अशी मुल पळवून नेणारी एखादी व्यक्ती आढळल्यास त्वरित जवळच्याच पोलीसस्टेशनश संपर्क साधावा. सूचना संपली.'

'आपल्यालाही खबरदारी घ्यायला हवी' प्रा. जोशी पत्नीला म्हणाले.

'हो तर, प्रयोगशाळेत जाताना तुम्ही मुलांना शाळेत सोडत जा. शाळा सुटल्याव मी त्यांना घेऊन येत जाईन.'

'चालेल !' ते टाय बांधता बांधता म्हणाले.

'बाबा, खरेच का हो शहरात मुले पळविणारी टोळी आली आहे?' मुलांनि विचारले.

'हो, आई येईपर्यंत कोठे जायचे नाही. शाळेतच थांबायचे' त्यांनी मुलांन समजावून सांगितले.

प्रा. जोशींनी मुलांना शाळेत सोडले आणि मग त्यांची कार प्रयोगशाळेकडे निघाली. त्या दिवशी शहरात सर्वत्र त्या दोन धक्कादायक बातम्यांबाबतच चर्चा चालू होती. मीटिंग सुरू व्हायला दहा मिनिटे असताना त्यांची कार प्रयोगशाळेच्या मोठ्या फाटकातून आत शिरली.

'गुड् मॉर्निंग !' ते जिना चढून वर जाताच प्रा. रानडे म्हणाले.

'गुड् मॉर्निंग, मीटिंगची सर्व तयारी झाली आहे ना?

'हो, आपण आपला शोध-निबंध आजच वाचणार ना?'

'हो, आजच्या पेपरमधल्या त्या दोन बातम्या वाचल्या?'

'धक्कादायक आहेत त्या ! अज्ञात व्यक्ती विद्युत्केंद्रात स्फोट घडवून ती नादुरुस्त का करते नि टेलिफोन्सचे खांब असे वाकवून, उपटून का टाकते, हे एक गूढच आहे.'

'आपल्याला याबाबत शोध घ्यायलाच हवा.'

'नक्कीच !'

एक वाजता चालू झालेली मीटिंग जवळजवळ साडेपाचला संपली.

अनेकजणांनी पेपर्स वाचले. प्रा. जोशी अर्धा तास शोधनिबंध वाचत होते. नंतर त्यांनी छोटेसे भाषणही केले.

'आपले आजचे भाषण छानच झाले.' पोर्चमधून मुख्य हॉलकडे जाताना प्रा. रानडे त्यांना म्हणाले.

'थँक्स !' ते हसत म्हणाले.

'सर, आपला फोन ...' तेवढ्यात प्रा. जोशींचा असिस्टंट म्हणाला.

'कोणाचा आहे?'

'सर, आपण त्या प्रयोगशाळेच्या उद्‌घाटनाला जाणार आहात ना, त्याबाबत.'

'साडेदहापर्यंत आम्ही दोघेही पोहचत आहोत, म्हणून सांग.'

'यस सर !'

प्रयोगशाळेचे उद्‌घाटन करून ते परतले तेव्हा नऊ वाजले होते. आता ते एका महत्त्वाच्या प्रयोगात गुंतले होते.

'मला वाटते हा प्रयोग आणखी दीड तास तरी चालणार. उशीर होणार असल्याचे घरी कळवून तरी द्यावे.' प्रा. जोशी म्हणाले.

लगेच मग दोघांनीही यायला उशीर होणार असल्याचे फोन करून घरी कळविले. हा प्रयोग यशस्वी होणे त्यांच्या करीअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते. रात्र बरीच झाली होती. खिडक्यांमधून किंचित् गारवा असणारा वारा येत होता. सर्वत्र शांत होते. त्या शांत वातावरणात घड्याळाची 'टिक् ऽ टिक्' अगदी स्पष्ट ऐकू येत होती. खिडक्यांच्या काचांवर चंद्राचा शीतल प्रकाश पडला होता. बाहेर झाडे डोलत होती. पानांची सळसळ होत होती. आज ते दोघे ही फार दमून गेले होते.

'अरे सदू, दोन कप चहा घेऊन ये जा.' प्रा. रानडेंनी शिपायाला सांगितले.

चहा घेतल्यावर त्यांना जरा तरतरीत वाटले.

'टण् ऽ टण् ऽ टण् ऽ' घड्याळात बाराचे टोल पडले.

'चला, निघायला हवे.' प्रा. जोशी चष्म्याच्या काचा साफ करता करता म्हणाले.

'कर्र ऽ कर्र ऽ' असा आवाज होत प्रयोगशाळेचे मुख्य फाटक उघडले. 'गुड्-नाईट!' असे म्हणत ते आपापली कार घेऊन बाहेर पडले. प्रा. रानडेंचे घर जवळच होते; पण प्रा. जोशींना मात्र जवळजवळ वीस मिनिटे लागायची घरी पोहचायला.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. प्रयोगशाळेकडे जाणारा रस्ता अगदी सामसूम होता.

कार वेगाने चालली होती. झाडे मागे पडत होती. सोडियमच्या दिव्यांच्या पिंगट प्रकाशात रस्ता अगदी चकचकीत काळा दिसत होता. दिवे वेगाने मागे पडत होते. कारच्या खिडक्यांच्या काचा खालीच केलेल्या होत्या. गार वाऱ्याचे झोत छान वाटत होते. रस्ता इतका सामसूम होता की, आता तर एकही वाहन जाताना किंवा येताना दिसत नव्हते. उजव्या बाजूला लांबच लांब गेलेल्या शेतांच्या रांगा होत्या. नंतर टेकड्या होत्या. चंद्र आता त्या टेकड्यांच्या पलीकडे चालला होता. कारच्या टायर्सचा 'चर्र s' असा होणारा आवाजच त्या शांत वातावरणात स्पष्ट जाणवत होता.

अचानक त्यांचे लक्ष रस्त्याच्या कडेला पडलेल्या एका टेलिफोनच्या खांबाकडे गेले. त्यांची कार शहराच्या बाहेर असणाऱ्या मुख्य विद्युत्केंद्राजवळून चालली होती. तेवढ्यात त्यांना एक माणूस त्या विद्युत्केंद्रातून बाहेर पडताना दिसला. तो बराच उंच होता. मात्र कार तेथे पोहचण्यापूर्वीच तो रस्ता क्रॉस करून वेगाने मुख्य रस्त्यापासून थोड्याच अंतरावर असणाऱ्या शेतात शिरला. हा साराच प्रकार संशयास्पद होता. हा माणूस कोण असावा नि इतक्या रात्री, हा या विद्युत्केंद्रात काय करीत होता? हाच प्रश्न त्यांना पडला होता. सकाळी वाचलेल्या बातमीशी तर याचा काही संबंध नाही? ते स्वतःशीच पुटपुटले. त्यांनी चटकन् कार थांबविली. तेही रस्त्याच्या कडेलाच असणाऱ्या, जेथून तो उंच माणूस शिरला होता तेथून शेतात शिरले. त्याचा पाठलाग केल्याशिवाय काहीच उलगडा होऊ शकणार नव्हता, पण ते तेवढे सोपे नव्हते. पिकांतून वाट काढीत पुढे जावे लागत होते. रस्ता तर दिसत नव्हताच. पिके अंगाला घासत होती. ते बुटांचा अजिबात आवाज न होऊ देता, त्या माणसाचा पाठलाग करीत होते. तो तर इतक्या लांब ढांगा टाकीत चालत होता की, क्षणाक्षणाला त्या दोघांमधील अंतर वाढतच चालले होते. त्या माणसाच्या हातात बहुतेक बॅटरी असावी, कारण किंचित् मंद प्रकाश त्याच्यासमोर पडत असल्यासारखे अधूनमधून जाणवत होते. प्रा. जोशींना तर आश्चर्याचा धक्काच बसला होता, कारण त्या माणसाच्या हालचाली एखाद्या यंत्रासारख्याच होत्या. चंद्राच्या प्रकाशात ते त्याला थोडेफार बघू शकत होते. आता त्या माणसाचा वेग इतका वाढला होता की, धावूनही त्याचा पाठलाग करणे अवघड जात होते. अखेर तो टेकडी चढू लागला. तो इतक्या वेगाने टेकडी चढत होता की, त्याला गाठणे आता जवळजवळ आपल्या आवाक्याबाहेरचे आहे, हे प्रा. जोशींनी ओळखले. मात्र तरी ते शक्यतितक्या वेगाने ती टेकडी चढू लागले. पाय घसरत होते. ते घामाघूम झाले होते.

धाप लागली होती. तो उंच माणूस टेकडीच्या शिखराकडे जातच होता. टेकडीवर सर्वत्र गडद अंधार पसरला होता. छोटे-मोठे दगड मधूनमधून पायाखाली येत होते. ठेचा लागत होत्या. चंद्रप्रकाशात मोठे दगड चमकत होते. वेगाने चढायचा प्रयत्न करताच पाय घसरायचे. खिशातील रुमाल काढून त्यांनी कपाळावरचा नि चेहऱ्यावरचा घाम पुसला आणि मग शक्य तितक्या वेगाने ते त्या माणसाच्या जास्तीत जास्त जवळ पोहचण्याचा प्रयत्न करू लागले. अचानक त्यांच्या लक्षात आले की, त्या माणसाला एकच हात आहे. आता तर ते त्या माणसाच्या बरेच जवळ पोहचले होते, पण एकाएकी श्वास कोंदाविणारा एक ऊग्र दर्प वातावरणात दाटला. डोळ्यांची आग होऊ लागली. खोकला येऊ लागला. डोके बधिरल्यासारखे वाटू लागले. डोळ्यांसमोर धुक्याचा एक पडदाच लावल्यासारखे झाले. हा काय प्रकार आहे, हेच त्यांना कळत नव्हते. बहुतेक त्या माणसाला कोणीतरी आपला पाठलाग करीत आहे, याची चाहूल लागली असावी आणि म्हणून ऊग्र दर्पाचा फवारा त्यांच्या दिशेने मारला असावा, असे त्यांना वाटले; पण काय? क्षणातच ते धुकेरी वलय इतके दाट झाले की, समोरचे काहीच दिसेनासे झाले. तरी प्रा. जोशींनी माघार घेतली नाही. त्या गर्द धुक्यातूनच वाट काढत ते चालले होते. लगेच त्यांनी नाकाला रुमाल बांधला. त्यांनी क्षणभर मागे वळून बघितले, तर मागे तसे गर्द धुके नव्हते. दूरवरच्या रस्त्यावरील मंदमंद दिवे दिसत होते. शहरातल्या उंच उंच इमारती दिसत होत्या. आपण मुख्य रस्त्यापासून फार दूर आलो आहोत, हे त्यांच्या लक्षात आले. ते टेकडीच्या शिखरावर पोहचले. तेथे धुके नव्हते. तो उंच माणूस कोठेच दिसत नव्हता. टेकडी उतरून ते थोडे खाली गेले, पण सर्वत्र सामसूम होते. कसलीच हालचाल जाणवत नव्हती. ते तर बुचकळ्यातच पडले होते. 'हा माणूस मग असा एकाएकी गेला तरी असावा कोठे?' - ते स्वतःशीच म्हणाले. टेकडीच्या पायथ्याशीच एक छोटे तळे होते. अचानक त्यांचे लक्ष बऱ्याच दूरवर खाली गेले, कारण तेथे क्षणभर एक लालसर दिवा लागून विझल्यासारखे झाले. ते तसेच टेकडी उतरून खाली गेले; पण तेथे काहीच नव्हते. तळे शांत होते. तळ्याच्या काठावर असलेल्या उंच उंच झाडांच्या गर्द सावल्या पडल्या होत्या. पायथ्याशीच काही प्रचंड काळे दगड चमकत होते. चांदण्या लुकलुकत होत्या. त्या मंद प्रकाशात प्रा. जोशींनी घड्याळात किती वाजले, हे बघितले. एक वाजला होता. म्हणजे जवळजवळ एक तास ते त्या माणसाचा पाठलाग करीत होते. तो परग्रहावरून आलेला माणूस तर नसावा ना, अशी

शंका त्यांच्या मनात सहज डोकावून गेली. कदाचित् यानातून तो निघून गेला असावा, असे त्यांना वाटले. त्यांनी काळजीपूर्वक आकाशात बघितले, पण आकाश अगदी स्वच्छ होते नि यान वगैरे काहीच दिसत नव्हते. ते थोडे निराशच झाले होते. ते त्यांच्या कारपाशी पोहचले, तेव्हा दीड वाजून गेला होता. त्यांनी कार तशीच पोलिस-स्टेशनकडे वळविली नि झालेला सारा प्रकार पोलिसांना सांगितला.

'तो माणूस दिसायला कसा होता?' पोलिस-इन्स्पेक्टरांनी त्यांना विचारले.

'मी त्याला पाठमोराच बघितले. तो उंच आहे नि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याला एकच हात आहे.'

'व्हेरी स्ट्रेंज!' इन्स्पेक्टर उद्गारले.

'आणि हो, त्याच्या हालचाली यंत्रासारख्या वाटल्या.'

'आम्ही आपले फार आभारी आहोत. लगेच तपास चालू करतो आम्ही.'

'बरं, मी चलतो. आणखी काही माहिती हवी असल्यास मला या नंबरवर फोन करा. हे माझे कार्ड. मी घरी नसलो, तर हा प्रयोगशाळेचा नंबर.'

'थँक्स!'

'घरी गेल्यावर त्यांनी पत्नीलाही घडलेला सारा प्रकार सांगितला.

'ट्रिंग ऽ ट्रिंग ऽ....' सकाळीच फोनची बेल वाजली.

'हॅलो, कोण?' प्रा. जोशींनी विचारले.

'आपले आभार कोणत्या शब्दात मानावेत हेच कळत नाही.' पोलीस-इन्स्पेक्टर बोलत होते.

'असे झाले आहे तरी काय?'

'आपल्या प्रसंगावधानामुळे या शहरातले सर्वात मोठे नि मुख्य विद्युत्केंद्र वाचले.'

'ते कसे?'

'काल रात्री आपण माहिती देताच आम्ही तपास सुरू केला.'

'मग?'

'विद्युत्केंद्राची तपासणी करताना एक जिवंत बाँब तेथे आढळला. लगेच तो निष्क्रिय करण्यात आला.'

'माय गॉड्!'

'आणि टेकडीच्या पलीकडे असणाऱ्या तळ्याकाठी आम्हाला पाऊलांच्या काही

खुणा मिळाल्या. त्या खुणा आणि विद्युत्केंद्राच्या आवारातील खुणा यात साम्य आहे. तपास चालूच आहे. सध्यातरी या प्रकरणाबाबत गुप्तता पाळली जात आहे.'

'बेस्ट ऑफ लक्!'

'थँक्स!'

प्रा. जोशींनी पेपर हाती घेतला, तेव्हा त्यांना धक्काच बसला. मोठ्या नि ठळक अक्षरात पहिल्याच पानावर बातमी होती-

'काल पुन्हा या शहरातली दोन मुले बेपत्ता!' तसेच त्या अज्ञात व्यक्तीची विध्वंसक कृत्ये चालूच असल्याचीही बातमी होती. शहरातील वातावरण जास्तीच घबराटीचे होत चालले होते. बेपत्ता झालेल्या मुलांचे फोटो टी. व्ही. वर दाखविण्यात येत होते व त्यांच्यापैकी कोणी आढळल्यास क्राइम-ब्रँचला कळविण्यास सांगितले जात होते. ही बेपत्ता झालेली मुले दत्तक म्हणून परदेशात पाठविली जाण्याची शक्यता असल्याने, सर्व विमानतळांवर कडक पहारा ठेवण्यात आला होता. स्कूल-बसेस सुरू करण्यात आल्या होत्या. मधल्या सुटीतही मुलांना शाळेच्या आवाराबाहेर सोडले जात नव्हते. आइस्क्रिम विकणारे, फळवाले यांच्यावरही नजर ठेवली जात होती. हरवलेल्या मुलांचे फोटो रेल्वेस्टेशन्स, बस-स्टँडस् वगैरे ठिकाणी लावले जात होते.

प्रयोगशाळेत जाताच प्रा. जोशींनी घडलेला सारा प्रकार प्रा. रानडेंना तपशीलवार सांगितला. त्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. लगेच ते दोघेही त्या तळ्याकाठी गेले, पण काय! तेथे सर्वत्र शांत होते. बोलत बोलत ते पुन्हा मुख्य रस्त्याकडे निघाले.

'तो माणूस परग्रहावरून आलेला तर नसावा?' प्रा. रानडे.

'शक्य आहे! पण..'

'पण काय?'

'विद्युत्केंद्रे अशी उडवून देण्यामागे नि संदेशयंत्रणा खंडित करण्यामागे त्याचा हेतु तरी काय असावा? हेच कळत नाही.'

'खरेच हा सारा प्रकार कोड्यात टाकणाराच आहे.' कारमध्ये बसताना प्रा. रानडे म्हणाले.

मध्यंतरी एक-दोन दिवस रात्री बारानंतर त्यांनी त्या विद्युत्केंद्राच्या आसपासच्या भागात जाऊन बघितले, पण त्यांना काहीच शोध लागला नाही. त्या

व्यक्तीविषयीचे गूढ दिवसेंदिवस वाढतच होते.

रात्रीचा जवळजवळ एक वाजला होता. एका महत्त्वाच्या प्रयोगात ते गढले होते. त्या दिवशी ते घरी जाणार नव्हते. एक नवा नि अतिशय महत्त्वपूर्ण शोध लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. तहान-भूक विसरून ते त्या प्रयोगात गढून गेलेले होते. 'टण्ऽ...' घड्याळात एकचा टोल पडला. त्या शांत वातावरणात तो फारच घुमला. हवेत गारवा जाणवू लागला होता. अचानक पलीकडच्या हॉलमध्ये 'खट्ऽ खट्ऽ' असा आवाज झाला.

'हा कसला आवाज?' प्रा. जोशी म्हणाले. तेवढ्यात कोणीतरी पळत असल्याचा आवाज आला.

'चला बघूया तरी काय प्रकार आहे ते.' प्रा. रानडे लेसर बंदूक सोबत घेत म्हणाले.

मात्र हॉलमध्ये कोणीच नव्हते. त्यांनी गॅलरीतून खाली डोकावून बघितले. जवळच्याच झाडांच्या सावलीत त्यांना एक व्यक्ती उभी असलेली दिसली, पण तिचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता.

'कोण आहे?' प्रा. रानडेंनी जरा मोठ्या आवाजात विचारले. त्यासरशी ती व्यक्ती ऊग्र दर्प येणारा, दम कोंदटणारा फवारा गॅलरीच्या दिशेने सोडू लागली.

'अरे, हा तर तोच माणूस! एक हात असणारा!' प्रा. जोशी रानडेंना म्हणाले.

'चला, त्याचा पाठलाग करू या.' प्रा. रानडे वेगाने जिना उतरताना म्हणाले. लगेच ते प्रयोगशाळेच्या आवारातील बागेत आले. मात्र ती व्यक्ती तेथे नव्हती. प्रयोगशाळेतील दिव्यांचा मंद प्रकाश बाहेर पसरला होता नि तो त्या माणसाचा शोध घेण्यास पुरेसा होता. तेवढ्यात प्रा. जोशींचे लक्ष जवळच असणाऱ्या भिंतीकडे गेले. तेथे अंधारात कोणीतरी भिंतीवर चढण्याचा प्रयत्न करीत होते. थोडे जवळ जाताच लक्षात आले की, तो एक हात असणारा माणूस आहे.

'कोण आहे? थांबा!' प्रा. रानडे म्हणाले; पण तो माणूस थांबला नाही. लगेच त्यांनी लेसर किरणांचा मारा केला. क्षणात तो उंच, एक हात असणारा माणूस खाली कोसळला. दोघेही धावतच त्याच्यापाशी पोहचले नि काय! त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला! तो यंत्रमानाव होता.

'हा काय प्रकार आहे?' प्रा. जोशी म्हणाले. तो यंत्रमानव निकामी होऊन पडला होता.

'हे बघा, याच्या हातात काय दिसते ते!' प्रा. रानडे प्रा. जोशींना म्हणाले. प्रा.

जोशींनी चमकणारी ती पंचकोनी वस्तू हातात घेतली. तो ट्रान्समीटर होता

'हा एक हाताचा माणूस परग्रहावरील नसून पृथ्वीवरच तयार केला गेलेला रोबो आहे.' प्रा. रानडे म्हणाले.

'यू आर राईट!' प्रा. जोशी. त्या रोबोचे निरीक्षण करीत म्हणाले. लगेच त्यांनी त्या चमकदार पंचकोनी ट्रान्समीटरचे एक छोटेसे हिरव्या रंगाचे बटन दाबले नि काय! 'कट् ऽ कट् ऽ' असा आवाज होऊन कोणीतरी बोलू लागले, 'प्रयोगशाळेतील संदेशयंत्रणेत बिघाड निर्माण करून होताच सरळ ठरलेल्या जागी यावे. टेकड्यांकडून येताना सावध राहावे, कारण पोलिसांची ये-जा चालूच असते. आज रात्रीच सारा प्लॅन आखायचा आहे. आता आपल्यापाशी फक्त छत्तीस तास आहेत' आणि मग संदेश येणे थांबले.

दोघांनाही त्या संदेशाचा काहीच उलगडा होत नव्हता.

'मला वाटते आपण त्या टेकडीपलीकडच्या तळ्याकाठी गेल्याशिवाय काहीच उलगडा होणार नाही' प्रा. रानडे त्या ट्रान्समीटरचे निरीक्षण करता करता म्हणाले.

'आज रात्री कसला प्लॅन आखला जाणार आहे नि कोणत्या गोष्टीला फक्त छत्तीस तास उरले आहेत, काहीच कळत नाही.'

'हा कसलातरी मोठा कट असावा.'

'शक्य आहे.'

'या रोबोला संदेश-यंत्रणा का निकामी करायची होती कोण जाणे !'

'नक्कीच काहीतरी भयंकर कट शिजतो आहे.'

'चला, वेळ वाया घालविता कामा नये.'

'लेसर बंदुका सोबत घ्यायला हव्यात.'

'हो तर...'

'या ट्रान्समीटरचे काय करायचे?'

'असू द्या आपल्या सोबतच. त्यावरून येणाऱ्या संदेशातून कदाचित् बराच उलगडा होऊ शकेल.'

आणि मग एक क्षणही वाया न घालविता ते दोघेही त्या टेकडीच्या पलीकडच्या पायथ्याशी असलेल्या तळ्यापाशी पोहचले. रात्र बरीच झालेली होती. आसपासचा सारा परिसर शांत होता. अतिशय सावधपणे ते तळ्याच्या आसपास काही हालचाली दिसतात का, याचा शोध घेत होते. तळ्यावर हिरवे शेवाळे पसरले होते. हलणाऱ्या

झाडांच्या गर्द सावल्या हलत होत्या. हलताना त्या सावल्या एकमेकांत मिसळून जात होत्या. चंद्राच्या प्रकाशात जवळपासचे छोटेमोठे दगड अगदी काळेकुळकुळीत दिसत होते.

'येथे तर कोणीच दिसत नाही.' प्रा. जोशी हळूच म्हणाले. त्या शांत वातावरणात वाऱ्याचा 'सूं s' असा आवाज स्पष्ट जाणवत होता. अचानक थोड्याच अंतरावर असणारा एक मोठा खडक हलू लागला आणि मग थोडा बाजूला सारला गेला. ते दोघेही लगेच जवळच असलेल्या एका झाडामागे लपले. तो खडक बाजूला सारला जाताच एक हात असलेला एक उंच रोबो तिथून बाहेर आला नि वेगाने टेकडी चढून गेला. लगेच ते त्या खडकापाशी गेले. त्या खडकाजवळच एक गोलाकार खड्डा दिसत होता. आत डोकावून बघतात तर काय! तेथे काही पायऱ्या दिसत होत्या.

'चला, बघूया तरी एकंदरीत प्रकार तरी काय आहे!' प्रा. जोशी म्हणाले आणि मग ते दोघेही अगदी सावधपणे पायऱ्या उतरून आत गेले. एका छोट्या रस्त्यावरून थोडे चालत जाताच त्यांना समोर लख्ख प्रकाश दिसला, जवळच पाच-सहा मोठ्या खोल्या होत्या. खिडक्यांच्या काचांतून मंद प्रकाश बाहेर फाकत होता. पाऊलांचा अजिबात आवाज होऊ न देता ते त्या खोल्यांच्या खिडक्यांपाशी पोहचले. आत डोकावून बघताच अनेक रोबो तेथे जमलेले त्यांना दिसले. ते सर्व रोबो विचित्र आवाजात एकमेकांशी बोलत होते. बोलताना ते आपला हात सारखा हलवीत होते. त्या खोल्यांना लागूनच असलेल्या हॉलमध्ये निरनिराळ्या आकाराची नि रंगांची काही यंत्रे एका मोठ्या टेबलावर मांडून ठेवलेली होती. त्या यंत्रासमोर बसून काही रोबो बोलत होते. ते बोलायचे तेव्हा त्यांच्या छातीवरचा लालसर दिवा लागत-विझत राहायचा.

'आपले अध्यक्ष येताच या देशावर आपण कसा ताबा मिळवायचा, याबाबत ते मार्गदर्शन करतील आणि त्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे आपल्याला वागायचे आहे. आल्यानंतर त्यांचे एक छोटेसे भाषणही होणार आहे.' एक रोबो इतर रोबोंना सांगत होता. त्यांचे बोलणे दोन्ही प्राध्यापकांना अगदी व्यवस्थित ऐकू येत होते. ते सुरक्षित ठिकाणाहून त्यांचे निरीक्षण करीत होते.

'म्हणजे संपूर्ण जगावरच ताबा घेण्याचा यांचा प्लॅन दिसतो.' प्रा. जोशी.

'तसेच दिसते एकंदरीत.'

'चला, पलीकडच्या हॉलमध्ये तरी डोकावून बघूया.'

लगेच ते पलीकडच्या हॉलपाशी पोहचले.

'हे काय, या हॉलमधून छोट्या मुलांच्या रडण्याचा आवाज येत आहे.' प्रा. रानडे.

'येथे तर बरीच मुले दिसत आहेत.' प्रा. जोशी हळूच आत डोकावून बघत म्हणाले.

'म्हणजे बेपत्ता झालेली मुले यांनीच पळविली होती तर !'

'आणि हे रोबो त्यांना काय सांगत आहेत?'

दोघांनीही खिडकीला कान लावून ऐकण्यास सुरुवात केली.

एक रोबो पुंगीतून येणाऱ्या आवाजासारख्या आवाजात बोलत होता- 'हे पाहा मुलांनो, आमचे म्हणणे ऐकल्यास आम्ही तुम्हाला काहीही इजा करणार नाही. आम्ही सांगितलेली कामे व्यवस्थित पार पाडल्यास तुम्हाला तुमच्या आई-वडिलांना भेटता येईल. मग आहात ना तयार?'

मुले अगदी घाबरून गेलेली होती. आई-वडिलांची आठवण येताच ती रडू लागली होती. त्या रोबोंच्या तावडीतून पळून जाणे तर त्यांना शक्य नव्हते, कारण कडक पहारा ठेवण्यात आला होता.

रोबो मग एका मुलाला समजावून सांगू लागला, 'हे बघ, हा बॉंब तू रेडिओ-स्टेशनमध्ये कोणाला नकळत नेऊन ठेवायचास.'

'छोट्या मुलांवर सध्या कोणी संशय घेत नाही. त्यांच्याकडून अशा घातपाती कारवाया करून घेणे त्यांच्या दृष्टीने सुरक्षिततेचे आहे.' प्रा. जोशी.

'खरे आहे.'

रोबोंच्या बोलण्याचा आवाज येत असलेल्या जवळच्या खोलीत मग त्यांनी डोकावून बघितले. साराच प्रकार विश्वास बसणार नाही असा होता. त्या खोलीत एका यंत्रासमोर काही रोबो बसले होते. त्यांच्या हातातील यंत्राचे बटन दाबून ते कोणाशीतरी बोलत होते. 'टिं ऽ टिं ऽ' असा आवाज होऊन त्या यंत्रातून कोणाचेतरी बोलणे ऐकू येत होते.

'आपली तयारी कोठवर आली आहे?' प्रश्न विचारला गेला.

'काळजी करण्याचे काहीच कारण नाही. सर्व तयारी अगदी जय्यत आहे.'

'आपले त्या देशातील प्रमुख आलेत का?'

'नाही. एका महत्त्वाच्या कामासाठी ते बाहेर गेले आहेत. आता येतीलच थोड्या वेळात.'

'ठीक आहे. आम्ही थोड्या वेळात पुन्हा संपर्क साधू.'

'चालेल.' एक रोबो म्हणाला.

आणि मग ते सर्व रोबो लगेच वेगाने जवळच्याच हॉलमध्ये निघून गेले.

'जगातील इतर देशातही या रोबोंचे जाळे पसरलेले दिसते.' प्रा. जोशी.

'नक्कीच.'

तेवढ्यात एक रोबो म्हणाला, 'अध्यक्ष आले आहेत.'

त्यांनी बघितले तर एक उंच रोबो त्या मोठ्या हॉलच्या दरवाज्यातून आत येताना त्यांना दिसला. त्या रोबोने त्या हॉलमध्ये प्रवेश करताच सर्वत्र फिकट हिरवा प्रकाश पसरला.

'नमस्कार!' सर्व रोबो विचित्र आवाजात गुणगुणल्यासारखे म्हणाले.

त्या अध्यक्ष रोबोने दाताने खुणावून सर्वांना खुर्चीत बसण्यास सांगितले. 'नंबर बावीस कोठे आहे?' त्याने विचित्र हातवारे करीत विचारले. त्या रोबोच्या खांद्यावर असणारा हिरव्या रंगाचा दिवा लागत-विझत होता.

'येईलच आता.' एका रोबोने अध्यक्ष रोबोला सांगितले. मग अध्यक्ष रोबो बोलू लागला-

'हे बघा मित्रांनो, आता आपल्यापाशी जवळजवळ फक्त चौतीस तास आहेत. तेव्हा या काळात आपल्याला अतिशय काळजीपूर्वक वागायला हवे. एकही छोटीशी चूक होता कामा नये. जगातील बहुसंख्य देशातील तयारी पूर्ण होत आल्याचे संदेशही येत आहेत. उद्या मध्यरात्री आपण या देशातील सर्व शहरांतील विद्युत्केंद्रांत स्फोट घडवून ती उडवून देऊ. टेलिफोन, टी.व्ही. सेंटर्स, रेडिओ केंद्रे- जी जनसंपर्कांची माध्यमे- नादुरुस्त करून ठेवू नि मग सर्वत्र गडद अंधार होताच, शस्त्रास्त्रांच्या साठ्यांजवळ वावरत असणारे आपले सहकारी, त्या संधीचा फायदा घेऊन त्या ठिकाणांवर पूर्णपणे ताबा प्रस्थापित करतील. अनेक ठिकाणी पळवून आणलेली छोटी मुलेही कार्यरत राहतील. आपल्या आंतरराष्ट्रीय संघटनेवरून संदेश मिळताच उद्या मध्यरात्री आपण हा प्लॅन राबविणार आहोत आणि मग जगातील सर्व अण्वस्त्रसाठे आपल्या ताब्यात येतील. संपूर्ण पृथ्वीवर आपलेच राज्य असणार! आतापर्यंत ही माणसे आपल्याला हवे तसे नि हवे तेव्हा राबवून घेत होती; पण आपणही त्यांना दाखवून देऊ की, आम्ही तुम्हाला राबवून घेऊ शकतो. गुलामच होतील ते आपले.'

अध्यक्ष रोबोचे भाषण संपताच सर्व रोबोंनी 'आँ ऽ आँ' असा आवाज करून त्यांना पाठिंबा दर्शविला. 'तर मग आता हा प्लॅन एक क्षणही न दवडता यशस्वीरीत्या पार पाडायचा. आता आपले राज्य यायला फार वेळ नाही.' अध्यक्ष रोबो हात उंचावत म्हणाला.

'भयंकरच दिसतो या रोबोंचा कट!' प्रा. जोशी.

'हो ना, आता आपल्याला वेगाने हालचाली करायला हव्यात, नाहीतर रोबोंचे राज्य यायला वेळ लागायचा नाही.'

'यांना बाहेर पडू देता कामा नये. सर्वांना नादुरुस्त करून ठेवून या छोट्या मुलांसह आपल्याला शक्यतितक्या लवकर येथून पळ काढायला हवा.'

'लेसर बंदुका तयार ठेवा.'

प्रा. जोशी नि रानडे मग जवळच्याच हॉलमध्ये शिरले. तेथे चार रोबो बाहेर पडायच्या तयारीतच होते. त्यांनी त्या रोबोंवर लेसर किरणांचा मारा करावयास सुरुवात करताच त्यांनी एक अतिशय ऊग्र दर्प असणाऱ्या द्रव्याचा फवारा त्यांच्या दिशेने केला. डोळ्यांची आग होऊ लागली. दम कोंडू लागला, तरी दोघांनीही त्या रोबोंना निकामी करण्यात यश मिळविले. मात्र ते रोबो निकामी होता होता त्यांच्या छातीवरील लालसर दिवा लागून विझला नि काय! 'ॐ ऽ - ऽ ॐ' असा आवाज करीत इतर खोल्यांतील, हॉलमधील रोबो वेगाने धावून येऊ लागले, पण दोन्ही प्राध्यापकांनी एका सुरक्षित ठिकाणाहून त्या सर्वांवर लेसर किरणांचा मारा केला. सर्व रोबो आता निकामी होऊन कोसळत होते. प्रा. जोशी नि रानडे यांनी त्यांच्या हातातील ट्रान्समीटर्स काढून घेतले आणि मग तेथे कोंडून ठेवलेल्या सर्व मुलांना सोबत घेऊन ते बाहेर पडले.

रात्र बरीच झाली होती. गारठा जाणवत होता. सर्वत्र अगदी चिडीचिप होते.

'चला, टेकडी पार करून आपल्याला लवकरात लवकर शहरात पोहचायला हवे.' ते दोघेही मुलांना सांगत होते. त्या गडद काळ्या अंधारात पायाखालची वाट शोधणे अवघड जात होते. चंद्राचा फिकट प्रकाश पसरला होता. टेकडी चढून जाताना छोट्या मुलांचे पाय घसरत होते. आता ते टेकडीच्या शिखरावर आले होते. आजूबाजूचा सारा प्रदेश धुक्यात बुडून गेलेला होता. दूरवरच्या रस्त्यावरील दिव्यांभोवती वलये निर्माण झाल्यासारखी वाटत होती. शहरातले दिवे थरथरत होते. शेत पार केले तेव्हा मुले पार दमून गेली होती. गारवा इतका होता की, नाकावर

बर्फाचा खडा ठेवल्यासारखे वाटत होते नि मग त्या दहाही मुलांना कारमध्ये घेऊन ते वेगाने शहराकडे निघाले. अजून त्यांना बरीच कामे करायची होती.

थोड्याच वेळात कार शहरातल्या मुख्य पोलीस-स्टेशनसमोर थांबली. प्रा. जोशी नि रानडे यांनी सर्व हकीकत पोलिसांना सांगितली.

'ओ आय सी!' पोलीस-इन्स्पेक्टर म्हणाले.

'या मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्या पालकांकडे पोहचते करा. अजून आम्हाला बरीच महत्त्वाची कामे आटोपायची आहेत आणि हो, उद्या मध्यरात्री शहरात विद्युत्केंद्रे, टी.व्ही. सेंटर्स, रेडिओ-केंद्रे नि जनसंपर्काच्या इतर महत्त्वाच्या जागी काही छोटी मुले बॉम्स् वगैरे ठेवायला जाणार आहेत, तेव्हा हुषारीने त्यांच्याजवळील बॉम्स् हस्तगत करावेत.'

'डोन्ट वरी. शहरात आम्ही अगदी कडक पहारा ठेवू.'

'बरं, निघतो मग आम्ही.' प्रा. रानडे.

'बेस्ट ऑफ लक्!'


'थँक्स!' प्रा. जोशी.

कार वेगाने प्रयोगशाळेकडे निघाली होती. जवळजवळ पहाटच व्हायला आली होती. प्रयोगशाळेत पोहचताच त्यांनी फोनवरून पंतप्रधानांना सर्व माहिती दिली. पंतप्रधानांनी ती माहिती लगेच जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांच्या प्रमुखांना कळविण्याची व्यवस्था केली. सर्व राष्ट्रे आता रोबोंचा तो कट हाणून पाडायला सज्ज झाली होती. शस्त्रास्त्रांच्या साठ्यांच्या परिसरात अगदी कडक पहारा ठेवण्यात येऊ लागला होता.

आणि मग दुसऱ्या दिवशी असंख्य रोबोंना ताब्यात घेऊन त्यांनी आखलेला कट पूर्णपणे हाणून पाडण्यात आला. काही रोबोंना निकामी करण्यात आले. छोट्या मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्या पालकांकडे पोहचविले जात होते. रोबोंचे राज्य येण्याचे संकट टळले होते. प्रा. जोशी नि रानडे यांना अभिनंदनाच्या तारा नि फोन्स सतत येतच होते.

'प्रा. जोशी आणि रानडे यांच्या प्रसंगावधानामुळे व साहसांमुळे रोबोंचे राज्य येण्यापासून संपूर्ण जग बचावले!' -अशी बातमी सर्व वृत्तपत्रांमध्ये त्यांच्या फोटोंसह पहिल्याच पानावर ठळक अक्षरात प्रसिद्ध झाली होती.

* * *



# १६. पूर्वसूचना

भूगर्भशास्त्रज्ञ प्रा. देशपांडे त्यांच्या अभ्यासिकेला लागूनच असणाऱ्या हॉलच्या गॅलरीत उभे होते. नुकतेच ते भूगर्भशास्त्रज्ञांच्या एका महत्त्वाच्या मीटिंगला जाऊन आले होते. त्या मीटिंगचे अध्यक्ष तेच होते. रात्रीचे जवळजवळ अकरा वाजले होते. टिक्‌टिक्‌णाऱ्या घड्याळात अकराचे टोल पडले. लांबच लांब गेलेल्या रस्त्यावर वाहनांची ये-जा चालूच होती. वाऱ्यात किंचत् गारवा येऊ लागला होता. आज दिवसभर त्यांना दम घ्यायलाही फुरसत मिळाली नव्हती. ते थकले होते. ते गार वाऱ्यात निवांतपणे उभे असले, तरी त्यांच्या डोक्यात सारखे ते लिहीत असलेल्या प्रबंधाविषयीचेच विचार येत होते. आपण जो नवा सिद्धांत मांडणार आहोत, तो मान्यता पावेल का? आपण जमा केलेले पुरावे पुरेसे ठरतील का? आणि असे कितीतरी विचार त्यांच्या डोक्यात येत होते. त्यांच्या प्रबंधाचा विषय होता, 'जीव हे पृथ्वीपूर्वीचे आहेत.' त्यांचा ठाम विश्वास होता की, जीवनमान हे पृथ्वीपेक्षा फार आधीच्या काळापासून आहे नि परग्रहावरून हे जीवनमान पृथ्वीवर आले आहे. लवकरच ते आपला प्रबंध सादर करणार होते. आज रात्रभर ते पुन्हा त्यांच्याजवळ

असलेल्या काही उल्कांच्या अवशेषांच्या नमुन्यांचा अभ्यास करणार होते. त्या उल्का अडतीसशे लाख वर्षांपूर्वीच्या आहेत, हे त्यांनी सिद्ध केले होते. यीस्टसारख्या पेशींशी दिसण्यास साम्य असणारे ते नमुने आज लोहपेशींशी तुलना करता भिन्न आढळत नव्हते. गेले दहा वर्षे ते त्यांच्या सिद्धांतासाठी संशोधन करीत होते. अनेक दुर्मिळ पुरावे त्यांनी मिळविले होते.

गॅलरीतून जेव्हा ते हॉलमध्ये परतले, तेव्हा त्यांचे लक्ष त्या हॉलला लागूनच असणाऱ्या अभ्यासिकेकडे गेले आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. बघतात तर अभ्यासिकेतला मोठा दिवा प्रकाशत होता. काचेच्या खिडक्यांमधून प्रकाश बाहेर पाझरत होता. क्षणभर त्यांना काहीच कळेनासे झाले. 'हा काय प्रकार आहे?' ते स्वतःशीच पुटपुटले. 'मी तर काल मध्यरात्रीच मोठा दिवा विझविला होता आणि आज सबंध दिवस बाहेरच होतो. मग हा दिवा लागला कसा काय?' ते मनातल्या मनातच म्हणत होते. बघितले तर अभ्यासिकेला कुलूप होते नि किल्ली त्यांच्याजवळच होती. त्यांना काहीच उलगडा होईना, तेव्हा ते वेगाने पावले टाकीत अभ्यासिकेकडे वळले. ते कुलूप उघडणार एवढ्यात आत काहीतरी खाडकन् पडल्याचा आवाज झाला. ते चकितच झाले.

'कोण आहे आत?' त्यांनी विचारले. मात्र आतून काहीच उत्तर आले नाही. पाठोपाठ पुन्हा 'किट् ऽ किट् ऽ कट्' असा आवाज आला. अखेर धाडस करून त्यांनी कुलूप उघडले. आवाज न होऊ देता दार ढकलले, पण प्रथम त्यांना तेथे काहीच दिसले नाही. मात्र अभ्यासिकेच्या त्या पलीकडच्या भिंतीला लागूनच असणाऱ्या खुर्चीकडे लक्ष जाताच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांच्याच डोळ्यांवर त्यांचा विश्वास बसत नव्हता.

त्या खुर्चीत गर्द हिरव्या रंगाचा एक माणूस बसला होता. त्याचे डोळे फार तेजस्वी होते. प्रखर प्रकाशझोतच त्याच्या डोळ्यांतून बाहेर पडत होते. तांबूस रंगाचे एक वलय त्याच्या भोवती होते. खांद्यावर दोन लालसर दिवे होते. ते लागत-विझत होते. सबंध अभ्यासिकेत एक विशिष्ट वास दाटला होता. मंद ध्वनिलहरी वातावरणात पसरत होत्या. हिरव्या रंगाचा तो माणूस अगदी निवांत बसला होता नि त्याच्या हातात एक छोटासा यंत्रमानव होता. यंत्रमानव मधूनमधून 'किट् ऽ किट् ऽ कट्' असा आवाज करीत होता. यापूर्वी त्यांनी असा माणूस कधीच बघितला नव्हता. आता तो माणूस त्या यंत्रमानवाशी 'पुट् ऽ पुट्' असा आवाज करीत काहीतरी बोलत

होता. अखेर हिंम्मत करून त्यांनी त्या हिरव्यागार माणसाला विचारले, 'आपण कोण?' त्या सरशी त्या माणसाने त्यांच्याकडे बघितले. त्याच्या डोळ्यांतून निघणाऱ्या प्रखर प्रकाशझोतामुळे त्यांचे डोळे दिपत होते. त्या माणसाच्या खांद्यावरील लालसर दिव्यांची उघडझाप झाली नि मग तो चक्क त्यांच्याच भाषेत बोलू लागला.

'मी परग्रहावरून आलो आहे.'

'पण कोणत्या?'

'पृथ्वीपासून कितीतरी दूर असणाऱ्या सूर्यमालेतील एका ग्रहावरून. आपण प्रा. देशपांडेच ना?'

'हो, पण तुम्हाला माझे नाव कसे काय माहीत?'

'तुम्ही, 'जीव हे पृथ्वीचेच' असा नवा सिद्धांत मांडताय ना?'

'पण हे सारे तुम्हाला कसे कळले?'

'आज भूगर्भशास्त्रज्ञांची जी मीटिंग झाली, त्याला मी हजर होतो.'

'मग कोठे दिसला नाहीत?'

'त्याचे असे आहे- म्हणजे मी हवे तेव्हा आकार बदलू शकतो. क्षणात मुंगीएवढादेखील होऊ शकतो.'

'हे कसे शक्य आहे?'

'आमची वैज्ञानिक प्रगती खूप झाली आहे. त्यातूनच हे शक्य होते.'

'पण तुम्ही माझ्याकडे का आलात?'

'एक महत्त्वाचे काम आहे म्हणून.'

'कसले?'

'ते मी नंतर सांगेन, पण त्याआधी मी तुम्हाला तुमचा सिद्धांत लवकर मान्यता पावावा, म्हणून थोडी मदत करणार आहे आणि तुमचा सिद्धांत मान्यता पावल्यानंतर तुम्ही माझे एक काम करायचे. येत्या पाच वर्षांत तुमच्या ग्रहावर एक संकट येणार आहे. त्याचीही पूर्वकल्पना मी देणार आहे.'

'कसले संकट?'

'मी नंतर सांगणार आहेच सारे.'

'ठीक आहे.'

लगेच त्या हिरव्या रंगाच्या माणसाने यंत्रमानवाचे एक बटन दाबले नि तो

काहीतरी पुटपुटला नि काय! यंत्रमानवाने त्याच्या हातातून टुणकन् खाली उडी मारली नि तो एक छोटीशी पेटी घेऊन आला. त्या तेजस्वी डोळ्यांच्या माणसाने मग त्याच्या हातातून ती पेटी घेतली नि प्रा. देशपांडे यांचे समोर ठेवली. ती पेटी कुठल्यातरी चमकदार धातूची होती व त्यावर वेगळ्याच लिपीत काही लिहिले होते.

'यात काय आहे?' त्यांनी त्या माणसाला विचारले.

तो माणूस ती पेटी उघडत म्हणाला, 'यात उल्कांच्या अवशेषांचे काही नमुने आहेत. हा पुरावा सादर करताच तुमचा सिद्धांत लगेच मान्य होईल. आता मी तुमच्याकडे का आलो, माझे काम काय होते नि पृथ्वीवर कुठले संकट येणार आहे, हे तपशीलवारच सांगतो, म्हणजे सारे चित्र स्पष्ट होईल.'

रात्र बरीच झालेली होती. रातकिडे किरकिरत होते. हवेतील गारवा वाढत होता. हा तेजस्वी डोळ्यांचा माणूस काय सांगणार याची उत्सुकता प्रा. देशपांडे यांना होती. 'सांगा' त्यांनी आपला होकार दर्शविला नि ते म्हणाले,

'आताचा हा पृथ्वीग्रह त्यावेळी आमच्या पूर्वजांचा फार आवडता ग्रह होता. कसा ते सांगतो. तो इतिहास एकंदरीत फार रंजक आहे. त्यावेळी तुमचा सूर्यही नव्हता. जवळजवळ पंधरा अब्ज वर्षांपूर्वी ह्यापासून काही प्रकाशवर्षे दूर असणाऱ्या एका प्रचंड सूर्याचा अचानक स्फोट झाला नि दोन तप्त गोल निर्माण झाले. त्यांपैकी एक तप्त गोल म्हणजे तुमचा सूर्य! दुसरा सूर्य म्हणजे तुमच्या सूर्याचा मोठा भाऊ. नतर तुमच्या सूर्याचा स्फोट होऊन पृथ्वीवर इतर ग्रह निर्माण झाले. पृथ्वी हा प्रारंभी एक तप्त गोलच होता. पृथ्वीचे वय दोन अब्ज वर्षे आहे.'

'पण पृथ्वी हा तुमचा आवडता ग्रह कसा झाला, ते कळले तर बरे होईल.'

'सांगतो. ही सारी माहिती तुम्हाला निश्चितच इंटरेस्टिंग वाटेल. त्याचे असे झाले. आमच्या सूर्याचा स्फोट होण्याची जवळजवळ नव्वद टक्के शक्यता होती आणि तसे झाल्यास आमचा ग्रह नष्टच होणार होता. आमची वैज्ञानिक प्रगती इतकी झालेली होती की, आम्ही सर्व मानवप्राणी यासह स्थलांतर करू शकणार होतो. मात्र मुख्य प्रश्न होता, तो योग्य वातावरण असणाऱ्या ग्रहाचा शोध कसा लागेल?' बऱ्याच प्रयत्नांनंतर आम्हाला पृथ्वी ह्या ग्रहाचा शोध लागला. त्यावेळी पृथ्वी पूर्णपणे थंड झालेली होती. पृथ्वीवरील आवरण घट्ट बनलेले होते. कितीतरी भाग पाण्यानेच व्यापलेला होता. पृथ्वीच्या गर्भातील दाबामुळे जमीन काही ठिकाणी उचलली जायची. काही ठिकाणी उंच पर्वत, तर काही ठिकाणी विस्तृत मैदाने अस्तित्वात आली होती.

आम्ही पृथ्वीवर स्थलांतर केले. आमच्या कितीतरी पिढ्या येथे वाढल्या. मात्र काही काळानंतर आमच्यावर भयंकर संकट कोसळले. अचानक पृथ्वीच्या एकंदर पृष्ठभागापैकी जवळजवळ निम्मा भाग बर्फाच्या दाट आवरणाखाली गेला. बऱ्याचदा त्या आवरणाची जाडी दोन मैलांपेक्षाही जास्त असायची. हे हिमावरण कधी पुढे सरकायचे, तर कधी वेगाने मागे सरकायचे. ते दाट आवरण पुढे सरकताच जास्तीत जास्त भूभाग त्याच्या आच्छादनाखाली जायचा. हिमनगाच्छादित प्रदेशातील तपमान अतिशय थंड असायचे. संपूर्ण जीवनच विस्कळीत झाले होते. प्राणी पटापट मरू लागले. प्रचंड जीवितहानी होत होती. अखेर शक्यतितक्यांनी या पृथ्वीवरून दुसऱ्या सूर्यमालेतील ग्रहावर स्थलांतर केले. मात्र काहीजण येथेच अडकून पडले. त्यांची अवस्था फार वाईट होती. अतिशय प्रगत असूनही त्यांना प्राथमिक अवस्थेतील मानवासारखे जीवन जगावे लागत होते. सुमारे एक लाख वर्षानंतर पुन्हा पृथ्वीवर योग्य वातावरण निर्माण झाले. तेव्हा ते हा ग्रह सोडून जाऊ शकले असते, पण त्यांनी येथेच राहायचे ठरविले; पण पृथ्वीवर आता संकट कोसळणार, हे बघून आम्हाला अतिशय वाईट वाटत आहे. त्यातच हेही लक्षात आले की, विज्ञानाचा येथे दुरुपयोग होत आहे. मानवच मानवाच्या नाशाचा मार्ग अवलंबू पाहात आहे. केवळ काही महासत्तांच्या शस्त्रस्पर्धेमुळे संपूर्ण पृथ्वीवर भयानक संकट ओढवू पाहात आहे. अणुयुद्धाचे दाट ढग डोक्यांवर वावरत आहेत. अणुयुद्धाचे परिणाम तुम्ही जाणता, पण पाऊले मात्र त्याच दिशेने पडत आहेत.'

'तुम्हाला म्हणायचे आहे तरी काय?' प्रा. देशपांडे म्हणाले.

घड्याळ टिकटिकत होते. यत्रंमानव 'किट्ऽ किट्' असा आवाज करीत होता. आसपासच्या सर्व भागात विशिष्ट ध्वनिलहरी पसरत होत्या. त्या गर्द हिरव्या रंगाच्या माणसाचे डोळे आता जास्तच प्रखर प्रकाशझोत फाकत होते नि खांद्यावरील दिव्यांची उघडझापही वेगाने होत होती.

'आमच्या ग्रहावरील शास्त्रज्ञ नि राष्ट्रप्रमुखांचे असे मत आहे की, पृथ्वीवर अणुयुद्ध होऊ नये. लवकरच पृथ्वीवर जे संकट ओढवणार आहे, ते कसे टाळता येईल, याचा विचार करावा. अणुयुद्धाचे गंभीर परिणाम तुम्ही जाणताच. युद्धानंतर जी रात्र सुरू होईल, ती एक वर्ष टिकेल. जे बचावतील ते मेलेल्यांचा हेवा करतील. अंधाराशिवाय काहीच दिसणार नाही.'

'पण पाच वर्षांनंतर पृथ्वीवर कोणते संकट ओढवणार ते तरी सांगा.'

'सांगतो. पाच वर्षांनी तुमच्या सूर्यमालेत एक नवा ग्रह प्रवेश करणार आहे. तो आकाराने प्रचंड असणार. या ग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे तो अतिशय तेजस्वी असेल आणि त्याच्या भोवती सात रंगांची वलये असतील. काही काळ तुमच्या सूर्यमालेत राहून मग तो ग्रह पुन्हा सूर्यमालेबाहेर जाणार आहे; पण त्यापूर्वी पृथ्वीभोवती तो एक प्रदक्षिणा करणार आहे. जाताना तो चंद्राच्या अगदी जवळून जाईल नि असे होत असताना तुमचा चंद्र त्या तेजस्वी ग्रहाच्या आकर्षणात खेचला जाण्याची दाट शक्यता आहे. तसे झाल्यास चंद्र तुम्हाला गमवावा लागेल. त्याचा एकंदर सूर्यमालेवरच अनिष्ट परिणाम होईल. पृथ्वीवर संकट कोसळायला मग वेळ लागणार नाही.'

'काय सांगता?'

'तसेच तुमचा चंद्र त्या सात रंगांची वलये असणाऱ्या ग्रहावर आदळून नष्ट होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.'

'मग यावर काही उपाय?' प्रा. देशपांडे यांनी विचारले.

'आहे तर...'

'कोणता?'

'तो आम्ही नंतर सांगू. अणुयुद्धाविषयी तुम्ही आमचे म्हणणे ऐकल्यास पृथ्वीवर येऊ पाहणारे संकट टाळण्यास, चंद्र वाचविण्यास पूर्ण सहकार्य देऊ, कारण पृथ्वी हा एकेकाळचा फार आवडता ग्रह आहे आणि आता आपले नातेही स्पष्टच झाले आहे.'

'पण याबाबतीत मी आपल्याला काय मदत करू शकतो?'

'केवळ तुम्हीच आम्हाला मदत करू शकता.'

'ती कशी काय?'

'हे उल्केच्या अवशेषांचे नमुने सादर करून तुम्ही 'जीव हे पृथ्वीपूर्वीचे नि बाह्य अवकाशातूनच ते पृथ्वीवर आले.' हे सहज सिद्ध करू शकता. तुमचा नवा सिद्धांत लगेच मान्यता पावेल.'

'त्यातून काय साध्य होणार?'

'मग पुढचे काम अगदी सोपे आहे. तुमचा सिद्धांत मान्यता पावताच तुम्ही परग्रहावरून एक महत्त्वपूर्ण संदेश पृथ्वीवर येणार असल्याचे येथे सर्व शास्त्रज्ञांना सांगायचे. आजपासून बरोबर पंधरा दिवसांनी आमच्या ग्रहावरील शास्त्रज्ञ नि काही राष्ट्राध्यक्ष संदेश पाठवतील. तेव्हा त्या दिवशी येथील सर्व निष्णात शास्त्रज्ञांची नि

राष्ट्रप्रमुखांची एक मीटिंग ॲरेंज करावी.'

'आणि तो संदेश काही राष्ट्रप्रमुखांना न पटल्यास?'

'मग मात्र आमचा आवडता ग्रह वाचविण्यासाठी आम्हाला इच्छा नसताना हस्तक्षेप करावा लागेल.'

'तो कसा काय?' प्रा. देशपांडे यांनी उत्सुकतेने विचारले.

'आमची वैज्ञानिक प्रगती खूप झाली आहे. अणुयुद्ध झालेच, तर आम्ही तुमची क्षेपणास्त्रे हवेतल्या हवेतच नष्ट करून टाकू. केवळ काही महासत्तांच्या सत्तास्पर्धेला आम्ही पृथ्वीवरील मानवांना व इतर जीवांना बळी जाऊ देणार नाही. विज्ञानाचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठीच व्हायला हवा. मी तुम्हाला आता माझा मित्रच मानतो. तुमचा नवा सिद्धांत मान्यता पावताच, मी तुम्हाला येऊन भेटेन. मात्र आपल्या भेटीबाबत तुम्ही कृपया गुप्तता पाळावी.' तो परग्रहावरचा माणूस सांगत होता.

त्या गर्द हिरव्या रंगाच्या माणसाच्या डोळयांतून आता इतके प्रखर प्रकाशझोत फाकत होते की, संपूर्ण प्रयोगशाळेत लख्ख प्रकाश पसरला होता. यंत्रमानवाला हातात घेऊन तो बसला होता. ध्वनिलहरी वेगाने पसरत होत्या. एक अगदी वेगळाच वास येत होता. मध्यरात्र होऊन गेलेली होती. खिडक्यांसमोरील झाडांवर धुके पसरलेले होते.

'बरं येतो!' तो म्हणाला. लगेच त्याच्या खांद्यावरील रंगीत दिवे लुकलुकले. डोळे दिपविणारा प्रकाश फाकला नि तो माणूस अदृश्य झाला. प्रा. देशपांडे यांचा त्यांच्याच डोळयांवर विश्‍वास बसत नव्हता. आपण स्वप्नात तर बघत नव्हतो ना, असे क्षणभर वाटले. समोरच्या टेबलावर उल्कांचे अवशेष असणाऱ्या चमकत्या धातूची छोटी पेटी होती. 'टण्ऽ टण्ऽ' चारचे टोल त्या शांत वातावरणात घुमले. मघा येत असलेला तो विशिष्ट वास हळूहळू येईनासा झाला.

आणि मग लवकरच प्रा. देशपांडे यांनी उल्केच्या अवशेषांच्या नमुन्यांच्या सहाय्याने 'जीव हे पृथ्वीपूर्वीचे असून बाह्यावकाशातून ते पृथ्वीवर आले' हा सिद्धांत मांडला. फारसा विलंब न लावता, तो मान्यता पावला. त्यांचा सत्कार करण्यात आला. त्या सिद्धांताला जगात सर्वत्र मान्यता मिळाली. निरनिराळया देशांतून अभिनंदनाच्या तारा येत होत्या.

त्या दिवशी ते नुकतेच बाहेरून आले होते नि गॅलरीत उभे राहून त्या गर्द

हिरव्या रंगाच्या माणसाबाबतच विचार करीत होते. दहा वाजले होते. इतक्यात अचानक गॅलरीसमोर असणाऱ्या झाडांमधून एक विचित्र वास येऊ लागला. पाठोपाठ ध्वनिलहरी येऊ लागल्या. बघतात तर काय! तो तेजस्वी डोळ्यांचा माणूस त्यांच्या समोर उभा!

'कॉग्रॅच्युलेशन्स!' तो म्हणाला.

'म्हणजे ती बातमी तुम्हाला कळली म्हणायची!'

'हो, आता लवकरात लवकर ते काम आटोपून टाका. मी आपला फार आभारी होईन.' असे म्हणून तो अदृश्यही झाला.

प्रा. देशपांडे यांनी त्या परग्रहावरच्या माणसाने सांगितल्यानुसार सर्व केले. त्या दिवशी ठरल्याप्रमाणे अनेक देशांच्या निष्णात शास्त्रज्ञांची नि राष्ट्रप्रमुखांची मीटिंग होती. मोठ्या हॉलमध्ये शांत वातावरण होते. पंखे गरगरत होते. गोलाकार टेबलाच्या अगदी मध्यभागी असलेल्या ट्रान्समीटरवर सर्वांचे लक्ष खिळले होते. येणाऱ्या संदेशाची सर्वजण उत्सुकतेने वाट बघत होते आणि मग अचानक 'वींऽ वींऽ वींऽ' असा आवाज येऊ लागला. संदेश येऊ लागला होता. तो त्यांच्याच भाषेत होता. सर्वजण तो अतिशय काळजीपूर्वक ऐकत होते. त्या संदेशात अणुयुद्ध टाळण्याबाबत नि पृथ्वीवर येऊ पाहणाऱ्या संकटाची माहिती देण्यात आली.

'अणुयुद्ध टाळण्यास आम्ही पृथ्वीला त्या भयंकर संकटातून वाचविण्याच्या मोहिमेत पूर्ण मदत करू. लवकरच आमच्या ग्रहावरील काहीजण पृथ्वीला भेट देण्यास येत आहेत. तुम्हीही आमच्या ग्रहाला भेट द्या. प्रा. देशपांडे यांचेकडून तुम्हाला सगळे कळलेच असेल. आता आपण मित्रच आहोत.' नि मग संदेश येणे थांबले.

'आम्ही पृथ्वीवर अणुयुद्ध होऊ देणार नाही.' महासत्तांच्या राष्ट्रप्रमुखांनी त्यांना सांगितले.

'थँक्स...' ट्रान्समीटरमधून आवाज आला.

***

पुढील कथा - क्रमशः पुढील भागावर चालू.

BVBK-0402381